# अधिसूचना/जाहीरनामा
# जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
# सन 2021-22 ते सन 2024 - 2025 वर्षांसाठी सोलापूर जिल्ह्यातील वाळू/रेती लिलावाकरिता
# ई-निविदा (e-Tendering) व ई-लिलाव (e-Auction)
# जाहिरात (प्रथम फेरी)

महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम-1966 मधील तरतुदीनुसार, भारत राजपत्र, पर्यावरण वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालय, अधिसुचना दि.14 सप्टेंबर 2006, महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम 2013 मधील तरतुदी, Sustainable Sand Mining Guidelines 2016, मा. राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांचेकडील O.A. No.368/2015 मध्ये दि.19.09.2018 रोजीचे आदेश, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रमांक:- गौखनि-10/0219/प्र.क्र.9/ख-1 दि.03.09.2019, Enforcement and Monitoring Guidelines for Sand Mining January-2020, मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, राज्यस्तरीय तज्ञ मुल्याकंन समिती (SEAC) यांचेकडील दि.11.10.2021 रोजीच्या बैठकीतील मान्यता, राज्यस्तरीय पर्यावरण परिणाम व्यवस्थापन प्राधिकरण (SEIAA) यांचेकडील दि.29.11.2021 रोजीच्या मान्यतेमधील सर्व अटी / शर्तीस अधीन राहुन तसेच सोलापूर जिल्हास्तरीय वाळु सनियत्रंण समितीकडून सोलापूर जिल्हयातील लिलाव योग्य वाळूस्थळास हातची किंमतीस (Upset Price) मंजुरी मिळालेनुसार **सन 2021-22 ते 2024-2025 (9 जुन 2025 पर्यंत)** वर्षांसाठी पर्यंतच्या कालावधी करीता **ई-निविदा (e-Tendering) व ई-लिलावाद्वारे** (e-Auction) सोलापूर जिल्हयातील 09 वाळूस्थळांचे जाहीर लिलाव करणेत येत आहे.

सदर जाहीर वाळू लिलावासंबंधी सर्व माहिती, वाळू लिलावाच्या अटी शर्ती, वाळूस्थळांची शासकीय किंमत व इतर सर्व माहिती जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर, गौण खनिज शाखा, सोलापूर तसेच सोलापूर जिल्हयातील सर्व उपविभागीय/ तहसिल कार्यालय येथे व जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूरचे संकेतस्थळ **solapur.gov.in** व **https://solapurco.abcprocure.com** या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेली आहे. तरी इच्छुक व्यक्ती / संस्थेस / लिलावधारकांना / कंत्राटधारकांना या लिलावात भाग घेण्याकरीता आवाहन करणेत येत आहे.

**ई-निविदा (e-Tendering) व ई-लिलाव (e-Auction) पध्दतीने लिलाव करावयाचा वाळूस्थळांच्या लिलावाचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे**.

| अ.क्र. | दिनांक | तपशिल |
|---|---|---|
| 1 | दि.24 / 12 / 2021 | ई-निविदा (e-Tendering) व ई-लिलावाच्या (e-Auction) सूचनेची प्रसिध्दी |
| 1 | दि.27 / 12 / 2021<br>ते<br>दि.10 / 01 / 2022 | दि.27 / 12 / 2021 रोजी सकाळी 11.00 वाजले पासून नोंदणी (Registration) ऑनलाईन पध्दतीने (संगणकीय नोंदणी) सुरु होईल. ती दि. 10 / 01 / 2022 सायंकाळी 5.00 पर्यंत सुरु राहील. यानंतर संगणकीय नोंदणी बंद होईल (शासकीय सुटटीचे दिवस वगळून) कोणत्याही परिस्थितीस मुदतवाढ मिळणार नाही. |
| 2 | दि.27 / 12 / 2021<br>ते<br>दि.11 / 01 / 2022 | दि. 27 / 12 / 20.21 रोजी सकाळी 11.00 वा पासून ते दि. 11 / 01 / 2022 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत ई-निविदा (e-Tendering) व ई-लिलाव (e-Auction) मध्ये भाग घेणाऱ्या व्यक्ती / संस्था / संस्थानी वाळू / रेती गटाची 25 % इसारा रक्कम जमा करणे.<br>इसारा रककम दि. 11 / 01 / 2022 रोजी सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत जमा करणे अनिवार्य राहील. त्यानंतर इसारा रक्कम स्विकारली जाणार नाही व त्यास सदर व्यक्ती / संस्था जबाबदार राहतील. |

| | | |
|---|---|---|
| 3 | दि.27 / 12 / 2021<br>ते<br>दि.12 / 01 / 2022 | दि.27 / 12 / 2021 सकाळी 11.00 पासून ते दि. 12 / 01 / 2022 सायं 5.00 पर्यंत निविदा ऑनलाईन पध्दतीने (संगणकीय पध्दतीने) भरणे.<br>दि. 12 / 01 / 2022 रोजी सायंकाळी 5.00 वा ई-निविदा (e-Tendering) ऑनलाईन (संगणकीय) पध्दतीने स्विकारणे बंद करणेत येईल. |
| 4 | दि.13 / 01 / 2022 | दि.13 / 01 / 2022 रोजी सकाळी 11.00 पासून ते दुपारी 3.00 पर्यंत ई-लिलाव (e-Auction) ऑनलाईन पध्दतीने सुरु राहील. वेळ समाप्तीच्या 10 मी. अगोदर बोली आलेस संगणकीय प्रणालीने प्रत्येकी 10 मिनीट प्रमाणे 03 (तीन) वेळा वाढ करण्यात येईल.. |
| 5 | दि.13 / 01 / 2022 | दि.13 / 01 / 2022 दुपारी ई-लिलावची (e-Auction) प्रक्रिया संपल्यानंतर पूढे ई-निविदा (e-Tendering) व ई-लिलाव (e-Auction) सायंकाळी 4.30 वा. त्याबाबतचा अंतिम निर्णय घेणेत येईल. |

ई-निविदा (e-Tendering) व ई-लिलाव (e-Auction) ऑनलाईन प्रशिक्षणाची दि. 28 / 12 / 2021 रोजी सकाळी 11.00 वाजता होईल त्याची माहिती **https://solapurco.abcprocure.com** या संकेतस्थळावर राहील.

तसेच ई-निविदा (e-Tendering) अथवा ई-लिलाव (e-Auction) कारणासह / कारणाशिवाय स्विकारण्याचे, नाकारण्याचे अथवा रद्द करण्याचे तसेच सदर लिलावामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी राखुन ठेवलेले आहेत.

ई-निविदाच्या (e-Tendering) व ई-लिलावाच्या (e-Auction) वेळी कोणत्याही कारणास्तव इंटरनेट, सर्व्हर, विद्युत किंवा अन्य तांत्रिक अथवा इतर स्वरुपाच्या अडचणीमुळे अडथळा आल्यास किंवा विलंब / दिरगाई झालेस जिल्हा प्रशासन म्हणुन सोलापूर जिल्हाधिकारी हे जबाबदार राहणार नाहीत. याबाबत इंटरनेट प्रणाली अथवा ऑनलाईन बँकिगच्या अडचणीची सबब मान्य केली जाणार नाही.

**स्थळ:- सोलापूर** .

**दिनांक** :- 23 / 12 /2021.

**सही/*****
**(मिलिंद शंभरकर** भा.प्र.से.**)**
**जिल्हाधिकारी, सोलापूर**

------ **xxxxx** -------

**<u>सन 2021-22 ते सन 2024- 2025 वर्षासाठी सोलापूर जिल्हयातील पर्यावरण अनुमतीप्राप्त वाळू/रेतीगट निर्गतीकरिता ई-निविदा (E-Tendering) व ई-लिलावाची (E-Auction) अधिसुचना.</u>**

जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर
क्र.मशा/कार्या-1/गौख/आरआर-3647
दि. 23 / 12 /2021.

# <u>परिशिष्ट-1</u>

महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम-1966 मधील तरतुदीनुसार, भारत राजपत्र, पर्यावरण वन और जलवायू परिवर्तन मंत्रालय, अधिसुचना दि.14 सप्टेंबर 2006, महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम 2013 मधील तरतुदी, Sustainable Sand Mining Guidelines 2016, मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांनी O.A. No.368/2015 मध्ये दि.19.09.2018 रोजीचे आदेश, महसूल व वन विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रमांक:- गौखनि-10/0219/प्र.क्र.9/ख-1 दि.03.09.2019, Enforcement and Monitoring Guidelines for Sand Mining January-2020, मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, राज्यस्तरीय तज्ञ मुल्यांकन समिती (SEAC) यांचेकडील दि.11.10.2021 रोजीच्या बैठकीतील मान्यता, राज्यस्तरीय पर्यावरण परिणाम व्यवस्थापन प्राधिकरण (SEIAA) यांचेकडील दि.29.11.2021 रोजीच्या मान्यतेमधील सर्व अटी / शर्तीस अधीन राहुन तसेच सोलापूर जिल्हास्तरीय वाळु सनियत्रंण समितीकडून सोलापूर जिल्हयातील लिलाव योग्य वाळूस्थळास हातची किंमतीस (Upset Price) मंजुरी मिळालेनुसार **<u>सन 2021-22 ते 2024-2025 (9 जुन 2025 पर्यंत)</u>** पर्यंतच्या कालावधी करीता **ई-निविदाद्वारे** (e-Tendering) **व ई-लिलावाद्वारे** (e-**Auction**) सोलापूर जिल्हयातील परिशिष्ट-अ मध्ये नमूद 09 वाळूस्थळांचे जाहीर लिलाव करणेत येत आहे.

सदर जाहीर वाळू लिलावासंबंधी सर्व माहिती, वाळू लिलावाच्या अटी शर्ती, वाळूस्थळांची शासकीय किंमत व इतर सर्व माहिती गौण खनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर, तसेच सोलापूर जिल्हयातील सर्व उपविभागीय/ तहसिल कार्यालय येथे, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूरचे संकेतस्थळ **solapur.gov.in** व **https://solapurco.abcprocure.com** या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेली आहे. तरी इच्छुक व्यक्ती / संस्थेस / लिलावधारकांना / कंत्राटधारकांना या लिलावात भाग घेण्याकरीता आवाहन करणेत येत आहे.

1. ई-निविदा **(e-Tendering)** व ई-लिलाव **(e-Auction)** प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या सर्व ईच्छुकांना ऑनलाईन नोंदणी (Registration) करणे आवश्यक आहे. ऑनलाईन नोंदणीकरिता (Registration) (संगणकीय नोंदणीकरिता) खाली नमूद बाबींची पुर्तता करणे अनिवार्य आहे.
2. **<u>लिलावधारक यांच्यासाठी आवश्यक पात्रता, अटी व शर्ती</u>** <u>(Technical bid documenhts):-</u>
   a) ई-मेल आयडी, पॅनकार्ड
   b) वस्तु व सेवा कर विभागाचा TIN क्रमांक
   c) मागील आर्थिक वर्षांमध्ये आयकर भरत असल्याचे विवरणपत्र तसेच व्यक्तीसाठी रेतीगट मुल्याच्या किमान 5 टक्के व संस्था व कंपनीसाठी रेतीगट मुल्याच्या किमान 10 टक्के एवढी उलाढाल असलेले सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र.
   d) विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र
   e) GST क्रमांक
   f) Digital Signature (Class 2 or Class 3 (Signing + Encryption)
   g) आधार क्रमांक व रहिवासाचा पुरावा
   h) कंपनी /संस्था असल्यास Registration पुरावा
3. **<u>अपात्रता</u>**
   **a)** वयाने अज्ञान, दिवाळखोर किंवा मतीमंद असेल अशी व्यक्ती
   **b)** केंद्र अथवा राज्य शासनामध्ये लाभाचे पद धारण केले असले अशी व्यक्ती
   **c)** गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची थकबाकी किंवा मृत भाटकाची रक्कम (Dead Rent) थकविण्यात आली असणारी व्यक्ती/संस्था या प्रयोजनार्थ जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत गौण खनिजाचे स्वामीत्वधान, मृत भाटक

रक्कम, किंवा शासनाच्या महसुलाची रक्कम थकबाकीदारांची यादी वेळोवेळी तयार करण्यात येईल व प्रसिध्द करण्यात येईल.

d) नैतिक अध:पतन केल्याबद्दल किंवा गौण खनिजाची अवैध उत्खनन किंवा वाहतुक केल्याबाबत शिक्षा झाली असेल अशी व्यक्ती

e) लगतपुर्वीच्या आर्थीक वर्षातील उलाढाल विहित मर्यादेपेक्षा कमी असल्यास - (व्यक्तीसाठी रेतीगट मुल्याच्या किमान 5 टक्के व संस्था व कंपनीसाठी रेतीगट मुल्याच्या किमान 10 टक्के एवढी उलाढाल असणे आवश्यक राहील.)

f) सदर लिलाव सूचनेत नमुद प्रक्रिया व सूचनांचे उल्लंघन करणारी सहभागी व्यक्ती / संस्था यांना अपात्र ठरविण्यात येईल.

वाळू लिलावाची प्रक्रिया ही ई-निविदा (e-Tendering) व ई-लिलाव (e-Auction) या दोन्ही प्रक्रियांद्वारे राबविली जाईल. ई-निविदा (e-Tendering) प्रक्रियेत भाग घेत असताना संबंधिताने https://solapurco.abcprocure.com या वेबसाईटवर ई-निविदा (e-Tendering) खरेदी करावी.

4. लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्थेने काळया यादीत नाव नसल्याबाबतचे व शासनाची कोणतीही वसुलीची रक्कम देणे थकीत नसलेबाबतचे शपथपत्र वाळू / रेतीघाट ई-निविदाधारकाने (e-Tendering) व ई-लिलावधारकाने (e-Auction) स्वखर्चाने विकत घेतलेल्या रुपये रु.500/- चे मुद्रांकित स्टॅम पेपरवर दोन साक्षीदारांच्या स्वाक्षरीसह इत्यादि कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच ई-निविदा (e-Tendering) भरत असताना अर्ज फी Banking/NEFT/RTGS या माध्यमातुनच जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे खात्यावर जमा करणे आवश्यक आहे.
5. लिलावाच्या निविदा भरु इच्छिणाऱ्या व्यक्ती/संस्था यांना निविदा अर्जाचे शुल्क, रु.5000/- जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे नावाने भरावे लागेल.
6. लिलावात भाग घेणाऱ्या इच्छुक लिलावधारकास नोंदणी शुल्क (Registration Fee) ही प्रति व्यक्ती/संस्था यांना (परत न करण्याच्या अटीवर) रु.3658/- (18% जीएसटी सहित) आणि ई-निविदामध्ये (e-Tendering) व ई-लिलावामध्ये (e-Auction) निवडलेल्या प्रत्येक वाळूघाटासाठी सहभाग फी रु.1947/- (18% जीएसटी सहित) भरणा करणे बंधनकारक राहील. सदरची देय रक्कम ई-पेमेंट जसे नेट बँकिंग/क्रेडीट कार्ड/ डेबिट कार्ड (NEFT/RTGS) पध्दतीने करुन वरील संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन खरेदी करावे लागेल.
7. लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्थेला निविदेसोबत इसारा रक्कम म्हणून लिलावात घेऊ इच्छित प्रत्येक वाळूस्थळाच्या हातची किंमतच्या (Upset Price) 25% रक्कम जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या नावे असलेल्या ICICI या बँक खात्यात खाते क्रमांक 019905007870 मध्ये **RTGS** द्वारे भरावी लागेल त्यासाठी इसारा रक्कम दि. 11 / 01 /2022 रोजी 4 :00 वाजेपर्यंत जमा करणे अनिवार्य राहील. सोबत **परिशिष्ट-अ** जोडलेले आहे.
8. जी व्यक्ती/संस्था ज्या वाळूगटाकरिता ई-निविदा (e-Tendering) भरेल अश्याच व्यक्ती/संस्थेला ई-लिलावमध्ये (e-Auction) मध्ये भाग घेता येईल. ई-निविदा (e-Tendering) ही ई-लिलाव (e-Auction) झालेनंतरच खुली करणेत येणार आहे या दोन्ही प्रकारच्या म्हणजेच ई-निविदा (e-Tendering) ही ई-लिलाव (e-Auction) यापैकी ज्यामध्ये सर्वाधिक दर नमुद असेल त्या ठेकेदारास लिलाव देणेत येईल.
9. सर्वोच्च बोलीचा देकार/निविदा स्विकारण्यात आलेल्या लिलावधारकाला लिलावाच्या बोलीच्या रकमेच्या 1/4 इतकी रक्कम लिलावाच्या दिवसानंतर कार्यालयीन कामकाजाच्या 48 तासांच्या आत जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे ऑनलाईन पध्दतीने भरावी लागेल. लिलावापुर्वी शासनजमा केलेली इसारा रक्कम ही सदर लिलावाच्या 1/4 रकमेत समायोजित करण्यात येईल. तसेच उर्वरित 3/4 रक्कम लिलावाच्या दिनांकापासुन **एका महिन्याच्या** आत जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या बँक खात्यात ऑनलाईन पध्दतीने भरावी लागेल. लिलावधारकाने लिलावाच्या बोलीच्या 3/4 रक्कम लिलावाच्या दिनांकापासुन विहित मुदतीत भरणार असल्याचे हमीपत्र रु.500/- च्या मुद्रकांनावर सादर करणे आवश्यक राहील.लिलावाच्या बोलीच्या 3/4 रक्कम भरण्याची मुदत आणखी 15 दिवसापर्यंत वाढविण्याचे अधिकार, त्यासंबंधीची सबळ कारणे नोंदवून, जिल्हाधिकारी यांना राहतील. मात्र अशा परिस्थितीत लिलावधारकास विलंबाने भरलेल्या सदर रकमेवर 15 टक्के वार्षिक दराने व्याज भरावे लागेल. त्यापलीकडे

अपावादात्मक परिस्थितीमुळे विलंब होत असल्यास लिलावाची 3/4 रक्कम भरण्याची मुदत वाढविण्याचे अधिकार शासनास राहतील.

10. लिलावधारकाने देकाराची उर्वरित 3/4 रक्कम विहित कालावधीत न भरल्यास तसेच विहित कालावधीत करारनामा करुन न दिल्यास वाळू गटाचा ताबा लिलावधारकास दिला जाणार नाही. अशा लिलावधारकाने शासनजमा केलेली 1/4 रक्कम जप्त करणेत येईल व अशा वाळूगटाचा शासन नियमाप्रमाणे फेरलिलाव करणेत येईल त्याबाबत लिलावधारकास कोणतीही तक्रार करता येणार नाही.
11. इतर पात्रता व्यतिरिक्त लिलावधारकास महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांकः- गौखनि-10/0219/प्र.क्र.9/ख-1 दि.03.09.2019 च्या पॅरा IX मध्ये नमुद पात्रताची पुर्तता करणे आवश्यक राहील.
12. ई-निविदाधारकास (e-Tendering) ही ई-लिलावधारकास (e-Auction) सर्वोच्च बोली व्यतिरिक्त पुढील प्रमाणे इतर शासन देय रक्कम जमा करणे आवश्यक राहील. (I) भूपृष्ठ भाडे (संबंधित वाळूस्थळाच्या क्षेत्रानुसार) (II) G.S.T. रक्कम. (III) TDS रक्कम (IV) भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सोलापूर यांचे नावे 5000/- सर्वेक्षण शुल्क. **(V)** मुद्रांक शुल्क सर्वोच्च बोलीच्या 0.2%. **(VI)** **<u>जिल्हा खनिज प्रतिष्ठान (ना-परतावा) स्वामित्वधनाच्या 10%.</u>** **(VII)** पर्यावरण शुल्क (बँक गँरटीच्या स्वरुपात) सर्वोच्च बोलीच्या 2%. **(VIII)** राज्य पर्यावरण विभागाने मंजुर केलेल्या पर्यावरण व्यवस्थापन आराखडयात नमुद केलेप्रमाणे रक्कम अदा करणे आवश्यक राहील व सदर सर्व रक्कमा किती भराव्या लागतील याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर (गौणखनिज शाखा) येथुन माहिती प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील. **(IX)** लिलावधारकाने करारनामा करतेवेळी संबंधित वाळूस्थळाच्या हातच्या किंमतीच्या 20% अनामत रक्कम भरणा करणे आवश्यक राहील.
13. लिलावामध्ये सर्वोच्च बोली बोलणाऱ्या ई-निविदाधारकास (e-Tendering) ही ई-लिलावधारकास (e-Auction) त्यांनी संपूर्ण रक्कम भरलेनंतरच वाळूगटाचा ताबा देणेत येईल. ताबा घेतल्याची तारीख काहीही असली तरी वाळूस्थळाची अंतिम मुदत त्या-त्या वर्षाची **दि.09 जुन** किंवा वाळूस्थळाचा ताबा जितक्या परिमाणासाठी देण्यात आला आहे त्याचे उत्खनन संपेल यापैकी जो कालावधी अगोदर संपुष्टात येईल ते अंतिम समजणेत येईल.
14. याव्यतिरिक्त शासनाकडुन वेळोवेळी शासन देय रक्कमाबाबत कोणतेही फेरबदल प्रस्तावित केले गेलेस ते सर्व लिलावधारकावर बंधनकारक राहतील.
15. ई-निविदामध्ये (e-Tendering) सहभाग घेतलेल्या लिलावधारकांनाच ई-लिलावमध्ये (e-Auction) भाग घेता येईल. तसेच मुदतीत दाखल झालेले ई-निविदा (e-Tendering) व ई-लिलाव (e-Auction) या एकाचवेळी म्हणजे दि. 13 / 01 /2022 रोजी 04.30 वा. उघडणेत येईल.
16. संबंधित वाळूस्थळास ई-निविदा (e-Tendering) व ई-लिलाव (e-Auction) प्रक्रियेमध्ये कमीत कमी 3 निविदाधारक असणे आवश्यक आहे. 3 पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतल्यास संबंधित ई-निविदा (e-Tendering) व ई-लिलाव (e-Auction) स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे सर्वस्वी अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.
17. ई-निविदा (e-Tendering) व ई-लिलाव (e-Auction) आता एकाच पोर्टलवर असल्यामुळे सर्व्हीस प्रोव्हायडर कडुन Alies Name, User ID, Password उपलब्ध करुन देण्यात येणार नाही. ई-टेंडर मध्ये सहभाग घेतला आहे अशा सहभागीने ज्या User ID ने ई-टेंडर मध्ये सहभाग घेतला आहे, त्याच User ID ने लॉगिन करुन पात्र असल्यास वाळू / रेती घाटाच्या ई-ऑक्शन मध्ये बोली लावता येईल.
18. ई-लिलावमध्ये (e-Auction) किमान रुपये 20,00,000/- व त्याच्या पटीतच बोली लावता येईल. उदा. हातच्या किंमतीवर रक्कम रु.20,00,000/- च्या पटीतच लावता येईल.
19. <u>लिलावाची प्रक्रिया पूर्ण झालेनंतर यशस्वी (वरचढ) ठरलेल्या लिलावधारकास वाळू स्थळाचा ताबा देतेवेळी जर वाळूस्थळ पाण्याखाली असेल तर वाळूस्थळाचा ताबा लिलावधारकास देण्यात येणार नाही. वाळूस्थळाचा ताबा हा नदी कोरडी असल्यास दिला जाईल याची नोंद घ्यावी.</u>
20. दि.11 ते 14 ऑक्टोबर 2021 राज्यस्तरीय तज्ञ मुल्यांकन समिती (SEAC) च्या सभेतील मिटींग मध्ये नमुद अटी व शर्ती व दि.29.11.2021 रोजीची राज्यस्तरीय पर्यावरण परिणाम व्यवस्थापन प्राधिकरण SElAA च्या सभेतील मंजुर मिटींग व दि.07.12.2021 रोजीची मान्य पर्यावरण अनुमती मधील अटी व शर्ती या लिलावधारक यांचेवर बंधनकारक राहतील.

## तीन स्वतंत्र लिलाव वर्षासाठी आयोजित ई-लिलावातील महत्वाच्या व्याख्या

## 2021-2022, 2022-2023, 2023-2024, 2024-2025 (09 जुन पर्यंत)

| | | |
|---|---|---|
| 1. | **लिलाव कालावधी** | ज्या वर्षासाठी लिलाव करण्यात येत आहे तो कालावधी. (लिलाव कालावधी हा उत्खनन कालावधी नाही) |
| 2. | **लिलाव वर्ष** | एका पेक्षा जास्त वर्षासाठी लिलाव होत असल्यास त्यामधील प्रत्येक वर्षाला लिलाव वर्ष क्रमांक 1, लिलाव वर्ष क्रमांक 2 व लिलाव वर्ष क्रमांक 3 असे संबोधण्यात येईल. तसेच या लिलाव वर्षासाठी प्रतिवर्ष येणाऱ्या 09 जुन रोजी उत्खनन कालावधी संपुष्टात येईल. |
| 3. | **वाळूसाठा** | वाळू साठा म्हणजे त्या-त्या वर्षी सर्व वैधानिक तरतूदी नुसार निर्धारित केलेला संबंधित वर्षासाठीचा प्रत्यक्ष उत्खनन योग्य वाळू / रेतीसाठा असा आहे.<br>**तांत्रीक उप समितीच्या सर्वेक्षणाअंती द्वितीय व तृत्तीय लिलाव वर्षात उत्तखनन करावयाच्या क्षेत्राच्या अक्षांश व रेखांश यात बदल होवू शकेल.** |
| 4. | **अपसेट प्राईस / हातची किंमत** | एका लिलाव वर्षासाठी किंवा एका पेक्षा जास्त वर्ष कालावधीसाठी लिलाव होत असल्यास प्रथम वर्षाच्या लिलावासाठी ठरविण्यात आलेली अपसेट प्राईस / हातची किंमत असा त्याचा अर्थ आहे. |
| 5. | **लिलाव रक्कम** | I) **प्रथम वर्षासाठी** |

ज्या बोलीवर लिलाव मंजूर करण्यात आला ती सर्वोच्च बोली. ही रक्कम लिलावधारकास लिलाव मंजूर झाल्यास 30 दिवसात भरावी लागेल.

II) **द्वितीय वर्ष**

द्वितीय वर्षासाठी लिलावधारकाने भरावयाची लिलाव रक्कम ही प्रथम लिलाव वर्षाच्या लिलावाच्या सर्वोच्च रक्कमेनुसार येणाऱ्या प्रती ब्रास दरामध्ये शासन निर्णयानुसार 6% वाढ मिळवुन येणारी रक्कम वाढ करुन जो दर येईल त्या दराने द्वितीय वर्षासाठी उपलब्ध होणाऱ्या उत्खनन योग्य रेतीसाठ्याच्या परिमाणाशी गुणाकार करुन येणारी रक्कम लिलाव धारकास दुसऱ्या वर्षीच्या उत्खनन सुरु करण्याअगोदर भरणे आवश्यक राहील. त्याशिवाय उत्खनन सुरु करता येणार नाही.

II) **तृतिय वर्ष**

तृतिय वर्षासाठी लिलावधारकाने भरावयाची लिलाव रक्कम ही द्वितीय लिलाव वर्षाच्या लिलाव रक्कमेनुसार येणाऱ्या प्रती ब्रास दरामध्ये शासन निर्णयानुसार 6% वाढ मिळवुन येणारी रक्कम वाढ करुन जो दर येईल त्या दराने तृतिय वर्षासाठी उपलब्ध होणाऱ्या उत्खनन योग्य रेतीसाठ्याच्या परिमाणाशी गुणाकार करुन येणारी रक्कम लिलाव धारकास तिसऱ्या वर्षीच्या उत्खनन सुरु करण्याअगोदर भरणे आवश्यक राहील. त्याशिवाय उत्खनन सुरु करता येणार नाही.

**उदाहरण** :-***प्रथम वर्ष भरावयाची रक्कम :-***

या लिलाव वर्षासाठी निश्चित केलेल्या हातच्या किंमतीवर लिलाव घारकांनी लावलेली सर्वोच्च देकाराची रक्कम.

समजा 1000 ब्रास रेती साठा असलेल्या रेतीघाटांचे अपसेट प्राईस 100000 असेल आणि सर्वोच्च बोलीची रक्कम *125000* असेल तर प्रती ब्रास रक्कमेची वाढ 6% असेल.त्यामुळे प्रथम वर्षाची प्रती ब्रास रक्कम रुपये 125 असेल

***द्वितीय वर्ष भरावयाची रक्कम :-***

*जर प्रथम वर्षासाठी सर्वोच्च देकार रुपये 125000* / *जर द्वितीय वर्षीचा उपलब्ध रेतीसाठा 1000* = ( *तर प्रथम वर्षासाठी प्रती ब्रास दर रुपये 125+ त्याच्या 6% (रु.7.50) वाढ करुन द्वितीय वर्षासाठी प्रती ब्रास दर = 132.5 रु.* )

*त्यामुळे जर द्वितीय वर्षासाठी उपलब्ध रेतीसाठा 1000 ब्रास असेल तर*
*1000×132.5 = 1,32,500 रुपये लिलावधारकास भरावे लागतील.*

***तृतिय वर्ष भरावयाची रक्कम :-***

*जर प्रथम वर्षासाठी सर्वोच्च देकार रुपये 132500 =* *तर द्वितीय वर्षासाठी*
*जर तृतिय वर्षीचा उपलब्ध रेतीसाठा 1000* *प्रती ब्रास दर रुपये 132.5+ त्याच्या*
*6% (रु.7.95 म्हणजे 8) वाढ करुन*
*द्वितीय वर्षासाठी प्रती ब्रास दर = 140.5 रु.*

*त्यामुळे जर तृतिय वर्षासाठी उपलब्ध रेतीसाठा 1000 ब्रास असेल तर*
*1000×140.5 = 1,40,500 रुपये लिलावधारकास भरावे लागतील.*
*असा तिन्ही वर्षासाठी दर येईल.*

6. **वाळू / रेती उत्खनन कालावधी**

लिलाव कालावधी दरम्यान ज्या कालावधीत लिलावधारकास प्रत्यक्ष उत्खनन करता येईल असा कालावधी म्हणजे "उत्खनन कालावधी" राहील, परंतु हा कालावधी त्या लिलाव वर्षाच्या 09 जुन रोजी संपुष्टात येईल. प्रथम वर्षासाठी लिलावाची संपुर्ण रक्कम भरुन करारनामा स्वाक्षरीत झाल्यानंतर मोजणी करुन प्रत्यक्ष ताबा दिल्यापासून 09 जून 2022 पर्यंत उत्खनन कालावधी राहील. त्यानंतर **दरवर्षी 1 ऑक्टोबर नंतर सर्व्हेक्षणानंतर उत्खनन योग्य वाळू / रेतीसाठा निश्चित करण्यात येईल.**

**तद्नंतर** EMP, Mining Plan, Enforcement and Monitoring Guideline for Sand Mining - 2020, **मधील तरतुदीनुसार आवश्यक नियोजन करण्यात येईल.**

**त्यानंतर पर्यावरण विषयक नाहरकत प्रमाणपत्रासाठी राज्यस्तरीय समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल.**

**सदर प्रस्तावास पर्यावरण विषयक मान्यता मिळाल्यानंतर उत्खननाची परवानगी देण्यात येईल. सदरची परवानगी निर्गमित दिनांकापासुन त्या वर्षीच्या 9 जुन पर्यंतच वैध असेल.**

**त्यामुळे प्रत्यक्ष उत्खननासाठी हवामान विषयक स्थितीस तसेच पर्यावरण अनुमती (EC) साठी लागणारा वेळ लक्षात घेता 1 ऑक्टोबर पासुन साधारणत: 4 महिन्याचा कालावधी अपेक्षित आहे व त्यात परिस्थितीनुरुप वाढ / घट होण्याची संभावना आहे.**

**त्यामुळे प्रत्यक्ष उत्खननासाठी त्या - त्या लिलाव वर्षात साधारणत: जानेवारी ते 09 जुन हा कालावधी उपलब्ध राहील असे अपेक्षित आहे, परंतु हया कालावधीत नैसर्गिक परिस्थिती / हवामान व पर्यावरण अनुमती (EC) साठी लागणारा वेळ यामुळे घट सुध्दा येऊ शकते याची लिलावधारकाने स्पष्ट नोंद घ्यावी. कोणत्याही परिस्थितीत उत्खनन कालावधी हा संपुर्ण 1 वर्षाचा राहील असे गृहीत धरु नये, त्यासोबतच त्या-त्या लिलाव वर्षात 10 जुन ते 30 सप्टेंबर मध्ये कुठल्याही परिस्थितीत उत्खनन करता येणार नाही याची सर्व लिलाव धारकांनी नोंद घ्यावी.**

**लिलाव धारक यांनी उपरोक्त उत्खनन कालावधी बाबतच्या तरतूदी समजुन घेऊन निविदा भरावी व उत्खनन कालावधी बाबत नोंद घेतली असुन सदर बाब समजली असल्याबाबत** रु.500/- **प्रतिज्ञावर स्वयंघोषणापत्र सादर करावे. कुठल्याही परिस्थितीत उत्खनन कालावधी वाढवून देण्याच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही याची लिलाव धारकांनी नोंद घ्यावी.**

लिलाव घेण्याची तारीख काहीही असेल तरीही लिलाव वर्ष त्या-त्या लिलाव वर्षाच्या 30 सप्टेंबर रोजी तर, त्या त्या लिलाव वर्षातील उत्खनन कालावधी हा 09 जुन रोजी संपुष्टात येईल.

10 जुन ते 30 सप्टेंबर हा मान्सुन कालावधी असल्याने त्यात कुठल्याही लिलाव धारकास उत्खनन करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

7. **उत्खनन केव्हा करता येईल**

उत्खनन योग्य वाळू / रेती साठा संपेपर्यंत वा उत्खनन कालावधी संपेपर्यंत या पैकी जे अगोदर येईल तोपर्यंतच उत्खनन करता येईल. उत्खनन योग्य साठा उपलब्ध असला तरीही उत्खनन कालावधी संपल्यानंतर त्याचे उत्खनन करता येणार नाही व उत्खनन कालावधी शिल्लक असला तरीही उत्खनन योग्य साठा संपल्यानंतर उत्खनन करता येणार नाही.

**वर नमुद केलेल्या अटी व शर्ती तसेच संकेतस्थळावर नमुद केलेल्या लिलावाबाबतचे सर्व अटी शर्ती मान्य असलेबाबतचे हमीपत्र रु.500/- च्या मुद्रांकावर सादर करणे अर्जदारास/लिलावधारकास बंधनकारक राहील.**

**ई-निविदा (e-Tendering) व ई-लिलाव (e-Auction) पध्दतीने लिलाव करावयाचा वाळूस्थळांच्या लिलावाचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | दिनांक | तपशिल |
|---|---|---|
| 1 | दि.24 / 12 / 2021 | ई-निविदा (e-Tendering) व ई-लिलावाच्या (e-Auction) सूचनेची प्रसिध्दी |
| 1 | दि.27 / 12 / 2021 ते दि.10 / 01 / 2022 | दि.27 / 12 / 2021 रोजी सकाळी 11.00 वाजले पासून नोंदणी (Registration) ऑनलाईन पध्दतीने (संगणकीय नोंदणी) सुरु होईल. ती दि. 10 / 01 / 2022 सायंकाळी 5.00 पर्यंत सुरु राहील. यानंतर संगणकीय नोंदणी बंद होईल (शासकीय सुटटीचे दिवस वगळून) कोणत्याही परिस्थितीस मुदतवाढ मिळणार नाही. |
| 2 | दि.27 / 12 / 2021 ते दि.11 / 01 / 2022 | दि. 27 / 12 / 20.21 रोजी सकाळी 11.00 वा पासून ते दि. 11 / 01 / 2022 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत ई-निविदा (e-Tendering) व ई-लिलाव (e-Auction) मध्ये भाग घेणाऱ्या व्यक्ती / संस्था / संस्थानी वाळू / रेती गटाची 25 % इसारा रक्कम जमा करणे.<br>इसारा रककम दि. 11 / 01 / 2022 रोजी सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत जमा करणे अनिवार्य राहील. त्यानंतर इसारा रक्कम स्विकारली जाणार नाही व त्यास सदर व्यक्ती / संस्था जबाबदार राहतील. |
| 3 | दि.27 / 12 / 2021 ते दि.12 / 01 / 2022 | दि.27 / 12 / 2021 सकाळी 11.00 पासून ते दि. 12 / 01 / 2022 सायं 5.00 पर्यंत निविदा ऑनलाईन पध्दतीने (संगणकीय पध्दतीने) भरणे.<br>दि. 12 / 01 / 2022 रोजी सायंकाळी 5.00 वा ई-निविदा (e-Tendering) ऑनलाईन (संगणकीय) पध्दतीने स्विकारणे बंद करणेत येईल. |
| 4 | दि.13 / 01 / 2022 | दि.13 / 01 / 2022 रोजी सकाळी 11.00 पासून ते दुपारी 3.00 पर्यंत ई-लिलाव (e-Auction) ऑनलाईन पध्दतीने सुरु राहील. वेळ समाप्तीच्या 10 मी. अगोदर बोली आलेस संगणकीय प्रणालीने प्रत्येकी 10 मिनीट प्रमाणे 03 (तीन) वेळा वाढ करण्यात येईल.. |
| 5 | दि.13 / 01 / 2022 | दि.13 / 01 / 2022 दुपारी ई-लिलावची (e-Auction) प्रक्रिया संपल्यानंतर पूढे ई-निविदा (e-Tendering) व ई-लिलाव (e-Auction) सायंकाळी 4.30 वा. त्याबाबतचा अंतिम निर्णय घेणेत येईल. |

तसेच ई-निविदा (e-Tendering) अथवा ई-लिलाव (e-Auction) कारणासह/कारणाशिवाय स्विकारण्याचे, नाकारण्याचे अथवा रद्द करण्याचे तसेच सदर लिलावामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी राखुन ठेवलेले आहेत.

ई-निविदा (e-Tendering) / ई-लिलाव (e-Auction) च्या वेळी कोणत्याही कारणास्तव इंटरनेट, सर्व्हर, विद्युत किंवा अन्य तांत्रिक अथवा इतर स्वरुपाच्या अडचणीमुळे अडथळा आल्यास किंवा विलंब / दिरगाई झालेस जिल्हा प्रशासन म्हणुन सोलापूर जिल्हाधिकारी हे जबाबदार राहणार नाहीत. याबाबत इंटरनेट प्रणाली अथवा ऑनलाईन बँकिंगच्या अडचणीची सबब मान्य केली जाणार नाही.

ई-निविदा (e-Tendering) / ई-लिलाव (e- Auction) बाबत ऑनलाईन प्रशिक्षणाची माहिती **https://solapurco.abcprocure.com** या संकेतस्थळावर राहील. ऑनलाईन प्रशिक्षण दिनांक 28 / 12 / 2021 रोजी सकाळी 11.00 वाजता राहील.

सर्वोच्च ई-निविदाधारकास (e-Tendering) ही ई-लिलावधारकास (e-Auction) सर्वोच्च बोलीनुसार वाळूस्थळ मंजूर करणेत येईल. ज्यांचे नावे लिलाव मंजुर होईल त्या लिलावधारकास भारत राजपत्र, पर्यावरण वन और जलवायू परिवर्तन मंत्रालय, अधिसुचना दि.14 सप्टेंबर 2006, महसूल व वन विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रमांकः- गौखनि-10/0219/प्र.क्र.9/ख-1 दि.03.09.2019, Sustainable Sand Mining Guiedines 2016, Enforcement and Monitoring Guidelines for Sand

Mining January 2020 व महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम 2013 मधील तरतुदी या संदर्भात मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय व मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, राज्यस्तरीय पर्यावरण तत्र मुल्यांकन समिती (SEAC) व राज्यस्तरीय पर्यावरण आघात मूल्यांकन प्राधिरण समितीच्या (SEIAA) मान्यतेमधील सर्व अटी, शर्ती व निर्देश व जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडील वेळोवेळी लागू केले गेलेल्या सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. ई-निविदा (E-tendering) व ई-लिलावाची (E-auction) मध्ये सहभागी होणाऱ्या इच्छुक व्यक्ती/ संस्था / लिलावाधारक / निविदाधारकांनाही सदरचे नियम, अटी व शर्ती लागू राहतील. त्यामुळे त्यांनी या संदर्भात वर नमुद सर्व तरतुदी, निर्णय व कायदे यांची माहिती घेऊनच लिलावात भाग घ्यावा.

इच्छुक व्यक्ती/संस्था/संस्थांना करावयाच्या ई-निविदा (E-tendering) व ई-ऑक्शन (E-auction) विषयक रजिस्ट्रेशन प्रक्रिया, डिजीटल सिग्नेचर, प्रथम स्तर मान्यताकामी एबीसी प्रोक्युअर येथील कंपनीच्या प्रतिनिधीशी संपर्क करणेकामी क्रमांक खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **व्यक्तीचे नाव** | **संपर्क क्रमांक** | **मोबाइल नंबर** | **ईमेल आयडी** |
|---|---|---|---|---|
| 1 | सोनू टंक | 079 35022180 | +91 6359576791 | sonu@abcprocure.com |
| 2 | सताब्दी डे | 079 35022167 | +91 9714297481 | info@abcprocure.com & himalay@abcprocure.com |

ई-निविदा /ई-ऑक्शन बोली करताना तांत्रिक मदतीसाठी एबीसी प्रोक्युअर कंपनीच्या प्रतिनिधीशी मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा

| **एस्केलेशन मॅट्रिक्स** | | | | |
|---|---|---|---|---|
| नाव | संपर्क क्रमांक | मोबाइल नंबर | ईमेल आयडी | सर्व साठी सामान्य ईमेल आयडी |
| नंदल वालेरा | -- | 9081000427 | nandan.v@eptl.in | support@abcprocure.com |
| प्रतीक पटेल | -- | 7622000287 | pratik.patel@eptl.in | |
| फहाद खान | -- | 9904406300 | fahad@eptl.in | |
| धरम राठोड | -- | 9374519754 | dharma@eptl.in | |
| ई-पेमेंटसंबंधित समर्थनासाठी, payment@eptl.in वर मेल करा आणि उपरोक्त क्रमांकांवर संपर्क साधा. | | | | |

लिलावासाठी प्रस्तावित वाळू / रेतीघाट संबंधी विस्तृत माहिती जसे नमुना फॉर्म, करारप्रत, रेतीघाट व अपसेट प्राईसची यादी, रेतीघाट लिलावाच्या अटी व शर्ती **https://solapurco.abcprocure.com** व **solapur.gov.in** या वेबसाईटवर तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी, संबंधित उपविभागीय अधिकारी, संबंधित तहसिलदार यांचे कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

**सही/******
**(मिलींद शंभरकर भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, सोलापूर.**

## लिलाव वर्ष 2021-2022, 2022-2023, 2023-2024 व 2024-2025 साठी सर्वसाधारण अटी व शर्ती

1. पर्यावरण विभाग, मुंबई राज्यस्तरीय तज्ञ मुल्यांकन समिती (SEAC) या समितीची बैठक क्र.207, दि.11 ते 14 ऑक्टोबर 2021 मध्ये प्रदान केलेल्या मान्यतेनूसार तसेच राज्यस्तरीय पर्यावरण परिणाम व्यवस्थापन प्राधिकरण SEIAA यांचे कडील बैठक क्र.233 दिनांक 29.11. 2021 व दि.07.12.2021 मधील मान्य पर्यावरण अनुमती मधील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे लिलावधारकावर बंधनकारक राहील.

2. **तीन स्वतंत्र लिलाव वर्षासाठी आयोजित ई-लिलावातील महत्वाच्या व्याख्या**

**2021-2022, 2022-2023, 2023-2024, 2024-2025 (09 जुन पर्यंत)**

| | | |
|---|---|---|
| 1. | **लिलाव कालावधी** | ज्या वर्षासाठी लिलाव करण्यात येत आहे तो कालावधी. (लिलाव कालावधी हा उत्खनन कालावधी नाही) |
| 2. | **लिलाव वर्ष** | एका पेक्षा जास्त वर्षासाठी लिलाव होत असल्यास त्यामधील प्रत्येक वर्षाला लिलाव वर्ष क्रमांक 1, लिलाव वर्ष क्रमांक 2 व लिलाव वर्ष क्रमांक 3 असे संबोधण्यात येईल. तसेच या लिलाव वर्षासाठी प्रतिवर्ष येणाऱ्या 09 जुन रोजी उत्खनन कालावधी संपुष्टात येईल. |
| 3. | **वाळूसाठा** | वाळू साठा म्हणजे त्या-त्या वर्षी सर्व वैधानिक तरतूदी नुसार निर्धारित केलेला संबंधित वर्षासाठीचा प्रत्यक्ष उत्खनन योग्य वाळू / रेतीसाठा असा आहे.<br>**तांत्रीक उप समितीच्या सर्वेक्षणाअंती द्वितीय व तृत्तीय लिलाव वर्षात उत्तखनन करावयाच्या क्षेत्राच्या अक्षांश व रेखांश यात बदल होवू शकेल.** |
| 4. | **अपसेट प्राईस / हातची किंमत** | एका लिलाव वर्षासाठी किंवा एका पेक्षा जास्त वर्ष कालावधीसाठी लिलाव होत असल्यास प्रथम वर्षाच्या लिलावासाठी ठरविण्यात आलेली अपसेट प्राईस / हातची किंमत असा त्याचा अर्थ आहे. |
| 5. | **लिलाव रक्कम** | I) **प्रथम वर्षासाठी**<br>ज्या बोलीवर लिलाव मंजूर करण्यात आला ती सर्वोच्च बोली. ही रक्कम लिलावधारकास लिलाव मंजूर झाल्यास 30 दिवसात भरावी लागेल.<br>II) **द्वितीय वर्ष**<br>द्वितीय वर्षासाठी लिलावधारकाने भरावयाची लिलाव रक्कम ही प्रथम लिलाव वर्षाच्या लिलावाच्या सर्वोच्च रक्कमेनुसार येणाऱ्या प्रती ब्रास दरामध्ये शासन निर्णयानुसार 6% वाढ मिळवुन येणारी रक्कम वाढ करुन जो दर येईल त्या दराने द्वितीय वर्षासाठी उपलब्ध होणाऱ्या उत्खनन योग्य रेतीसाठ्याच्या परिमाणाशी गुणाकार करुन येणारी रक्कम लिलाव धारकास दुसऱ्या वर्षीच्या उत्खनन सुरु करण्याअगोदर भरणे आवश्यक राहील. त्याशिवाय उत्खनन सुरु करता येणार नाही.<br>II) **तृतिय वर्ष**<br>तृतिय वर्षासाठी लिलावधारकाने भरावयाची लिलाव रक्कम ही द्वितीय लिलाव वर्षाच्या लिलाव रक्कमेनुसार येणाऱ्या प्रती ब्रास दरामध्ये शासन निर्णयानुसार 6% वाढ मिळवुन येणारी रक्कम वाढ करुन जो दर येईल त्या दराने तृतिय वर्षासाठी उपलब्ध होणाऱ्या उत्खनन योग्य रेतीसाठ्याच्या परिमाणाशी गुणाकार करुन येणारी रक्कम लिलाव धारकास तिसऱ्या वर्षीच्या उत्खनन सुरु करण्याअगोदर भरणे आवश्यक राहील. त्याशिवाय उत्खनन सुरु करता येणार नाही.<br>**उदाहरण** :-***प्रथम वर्ष भरावयाची रक्कम :-***<br>या लिलाव वर्षासाठी निश्चित केलेल्या हातच्या किंमतीवर लिलाव घारकांनी लावलेली सर्वोच्च देकाराची रक्कम. |

समजा 1000 ब्रास रेती साठा असलेल्या रेतीघाटांचे अपसेट प्राईस 100000 असेल आणि सर्वोच्च बोलीची रक्कम *125000* असेल तर प्रती ब्रास रक्कमेची वाढ 6% असेल.त्यामुळे प्रथम वर्षाची प्रती ब्रास रक्क्म रुपये 125 असेल

***द्वितीय वर्ष भरावयाची रक्कम :-***

*जर प्रथम वर्षासाठी सर्वोच्च देकार रुपये 125000 =* / *जर द्वितीय वर्षीचा उपलब्ध रेतीसाठा 1000* ( *तर प्रथम वर्षासाठी प्रती ब्रास दर रुपये 125+ त्याच्या 6% (रु.7.50) वाढ करुन द्वितीय वर्षासाठी प्रती ब्रास दर = 132.5 रु.* )

*त्यामुळे जर द्वितीय वर्षासाठी उपलब्ध रेतीसाठा 1000 ब्रास असेल तर*
*1000×132.5 = 1,32,500 रुपये लिलावधारकास भरावे लागतील.*

***तृतिय वर्ष भरावयाची रक्कम :-***

*जर प्रथम वर्षासाठी सर्वोच्च देकार रुपये 132500 =* / *जर तृतिय वर्षीचा उपलब्ध रेतीसाठा 1000* ( *तर द्वितीय वर्षासाठी प्रती ब्रास दर रुपये 132.5+ त्याच्या 6% (रु.7.95 म्हणजे 8) वाढ करुन द्वितीय वर्षासाठी प्रती ब्रास दर = 140.5 रु.* )

*त्यामुळे जर तृतिय वर्षासाठी उपलब्ध रेतीसाठा 1000 ब्रास असेल तर*
*1000×140.5 = 1,40,500 रुपये लिलावधारकास भरावे लागतील.*
*असा तिन्ही वर्षासाठी दर येईल.*

6. **वाळू / रेती उत्खनन कालावधी** लिलाव कालावधी दरम्यान ज्या कालावधीत लिलावधारकास प्रत्यक्ष उत्खनन करता येईल असा कालावधी म्हणजे "उत्खनन कालावधी" राहील, परंतु हा कालावधी त्या लिलाव वर्षाच्या 09 जुन रोजी संपुष्टात येईल. प्रथम वर्षासाठी लिलावाची संपुर्ण रक्कम भरुन करारनामा स्वाक्षरीत झाल्यानंतर मोजणी करुन प्रत्यक्ष ताबा दिल्यापासून 09 जून 2022 पर्यंत उत्खनन कालावधी राहील. त्यानंतर **दरवर्षी 1 ऑक्टोबर नंतर सर्व्हेक्षणानंतर उत्खनन योग्य वाळू / रेतीसाठा निश्चित करण्यात येईल.**

**तद्‌नंतर** EMP, Mining Plan, Enforcement and Monitoring Guideline for Sand Mining - 2020, **मधील तरतुदीनुसार आवश्यक नियोजन करण्यात येईल.**

**त्यानंतर पर्यावरण विषयक नाहरकत प्रमाणपत्रासाठी राज्यस्तरीय समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल.**

**सदर प्रस्तावास पर्यावरण विषयक मान्यता मिळाल्यानंतर उत्खननाची परवानगी देण्यात येईल. सदरची परवानगी निर्गमित दिनांकापासुन त्या वर्षीच्या 9 जुन पर्यंतच वैध असेल. त्यामुळे प्रत्यक्ष उत्खननासाठी हवामान विषयक स्थितीस तसेच पर्यावरण अनुमती (EC) साठी लागणारा वेळ लक्षात घेता 1 ऑक्टोबर पासुन साधारणत: 4 महिन्याचा कालावधी अपेक्षित आहे व त्यात परिस्थितीनुरुप वाढ / घट होण्याची संभावना आहे.**

**त्यामुळे प्रत्यक्ष उत्खननासाठी त्या-त्या लिलाव वर्षात साधारणत: जानेवारी ते 09 जुन हा कालावधी उपलब्ध राहील असे अपेक्षित आहे, परंतु हया कालावधीत नैसर्गिक परिस्थिती / हवामान व पर्यावरण अनुमती (EC) साठी लागणारा वेळ यामुळे घट सुध्दा येऊ शकते याची लिलावधारकाने स्पष्ट नोंद घ्यावी. कोणत्याही परिस्थितीत उत्खनन कालावधी हा संपुर्ण 1 वर्षाचा राहील असे गृहीत धरु नये, त्यासोबतच त्या-त्या लिलाव वर्षात 10 जुन ते 30 सप्टेंबर मध्ये कुठल्याही परिस्थितीत उत्खनन करता येणार नाही याची सर्व लिलाव धारकांनी नोंद घ्यावी.**

**लिलाव धारक यांनी उपरोक्त उत्खनन कालावधी बाबतच्या तरतूदी समजुन घेऊन निविदा भरावी व उत्खनन कालावधी बाबत नोंद घेतली असुन सदर बाब समजली असल्याबाबत** रु.500/- **प्रतिज्ञावर स्वयंघोषणापत्र सादर करावे. कुठल्याही परिस्थितीत उत्खनन कालावधी वाढवून देण्याच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही याची लिलाव धारकांनी नोंद घ्यावी.**

लिलाव घेण्याची तारीख काहीही असेल तरीही लिलाव वर्ष त्या-त्या लिलाव वर्षाच्या 30 सप्टेंबर रोजी तर, त्या त्या लिलाव वर्षातील उत्खनन कालावधी हा 09 जुन रोजी संपुष्टात येईल.

10 जुन ते 30 सप्टेंबर हा मान्सुन कालावधी असल्याने त्यात कुठल्याही लिलाव धारकास उत्खनन करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

7. **उत्खनन केव्हा करता येईल** — उत्खनन योग्य वाळू / रेती साठा संपेपर्यंत वा उत्खनन कालावधी संपेपर्यंत या पैकी जे अगोदर येईल तोपर्यंतच उत्खनन करता येईल. उत्खनन योग्य साठा उपलब्ध असला तरीही उत्खनन कालावधी संपल्यानंतर त्याचे उत्खनन करता येणार नाही व उत्खनन कालावधी शिल्लक असला तरीही उत्खनन योग्य साठा संपल्यानंतर उत्खनन करता येणार नाही.

3. उत्खनन कालावधी बाबतचे स्वयंघोषणापत्र दिल्याशिवाय लिलावात सहभागी होता येणार नाही.

4. वाळू / रेती गटासाठी निश्चित करण्यात आलेल्या हातची किंमतीपेक्षा (upset price) अधिक रकमेने लिलावाच्या बोलीची सुरुवात करण्यात यावी.

5. सर्वोच्च बोलीचा देकार / निविदा स्विकारण्यात आलेल्या लिलावधारकाला लिलावाच्या बोलीच्या रकमेच्या 1/4 इतकी रक्कम लिलावाच्या दिवसानंतर कार्यालयीन कामकाजाच्या 48 तासाच्या आत जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात भरावी लागेल. लिलावापूर्वी शासनजमा केलेली इसारा रक्कम ही सदर लिलावाच्या बोलीच्या 1/4 रकमेत समायोजित करण्यात येईल. तसेच, उर्वरित 3/4 रक्कम लिलावाच्या दिनांकापासून 1 महिन्याच्या आत प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात भरावी लागेल. लिलावधारकाने लिलावाच्या बोलीच्या 3/4 रक्कम लिलावाच्या दिनांकापासून विहीत मुदतीत भरणार असल्याचे हमीपत्र अशा हमीचे दायित्व स्विकारणाऱ्या दोन व्यक्तीसह रु.500/- च्या मुद्रांकावर सादर करणे आवश्यक राहील. लिलावाची संपुर्ण रक्कम भरल्याशिवाय उत्खनन परवानगी देण्यात येणार नाही.

अपवादात्मक परिस्थितीत लिलावाच्या बोलीच्या 3/4 रक्कम भरण्याची मुदत आणखी 15 दिवसापर्यंत वाढविण्याचे अधिकार, त्यासंबंधीची कारणे नोंदवुन, जिल्हाधिकारी यांना राहतील. मात्र अशा परिस्थितीत लिलावधारकास विलंबाने भरलेल्या सदर रकमेवर 15 टक्के वार्षिक दराने व्याज भरावे लागेल. त्यापलीकडे अपवादात्मक परिस्थितीमुळे विलंब होत असल्यास लिलावाची 3/4 रक्कम भरण्याची मुदत वाढविण्याचे अधिकार शासनास राहतील. लिलावधारकाने शिल्लक राहिलेली 3/4 रक्कम एक महिन्याच्या आत भरल्यानंतर व करारपत्र केल्यानंतर, त्याला वाळू स्थळाचा प्रत्यक्षात ताबा उशीरात उशीरा 7 दिवसात देण्यात येईल तदनंतरच संबंधितास उत्खनन सुरु करता येईल. द्वितीय आणि तृतिय वर्षासाठी उत्खनन सुरु करण्याअगोदर निर्धारीत प्रमाणात व निर्धारीत मुदतीत रक्कम भरणे अनिवार्य राहील.

6. लिलावात भाग घेऊ इच्छिणा-या व निविदा भरु इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्ती/संस्थेला निविदा सादर करताना 1/4 इसारा रक्कम RTGS/NEFT द्वारे भरावी लागेल.

7. प्रस्तावित लिलावासंदर्भात काही तक्रारी / आक्षेप / सूचना प्राप्त झाल्यास जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांचेमार्फत त्याची तपासणी / चौकशी करणेत येईल व लिलाव न करण्यास सबळ कारणे असल्याची खात्री झाल्यास संबंधित वाळूगटाच्या लिलावाची प्रक्रिया स्थगित करणेत येईल.

8. आयकर अधिनियमातील तरतूदीनूसार लिलावातील सर्वोच्च किमंतीच्या अनुषंगाने टिडीएस देणे लिलावधारकास बंधनकारक राहील. तसेच त्यांना वस्तू व सेवाकर खात्याकडे नियमानूसार वस्तू व सेवाकर शासन जमा करणे बंधनकारक राहील.

9. यशस्वी लिलावधारकांसोबत वाळू/रेतीच्या लिलावाच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे लिलावाची रक्कम रु. 10 लाखापर्यंत असल्यास लिलावाच्या रकमेच्या 0.1 टक्का किंवा रु. 100/- यापैकी जे अधिक असेल तेवढे मुद्रांक शुल्क व लिलावाची रक्कम रु. 10 लाखापेक्षा जास्त असल्यास लिलावाच्या रकमेवर 0.2 टक्के मुद्रांक शुल्काची रक्कम संबंधीत लिलावधारकाने भरणे आवश्यक राहील.

10. लिलावधारकाने/परवानाधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ हातच्या किंमतीच्या 20 % एवढी रक्कम अनामत रक्कम (Security Deposit) म्हणून प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे ठेवणे आवश्यक राहील. ही रक्कम लिलावधारकाने / परवानाधारकाने लिलावाच्या/परवान्याच्या मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास, लिलावाची/परवान्याची मुदत संपल्यानंतर परत करण्यात येईल. अटी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

11. लिलावधारकाने / परवानाधारकाने जिल्हा परिषद/पंचायत समिती तसेच शासनाने विहित केलेले 10 टक्के ना परतावा कर/शुल्क व जिल्हा खनिज प्रतिष्ठान करिता शासन वेळोवेळी निश्चित करील एवढी अंशदानाची रक्कम अदा करणे बंधनकारक राहील.

12. लिलावातील / निविदेतील सर्वोच्च बोलीचा देकार स्विकारावयाचा किंवा नाकारावयाचा निर्णय प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांनी घ्यावयाचा असून सदर निर्णय संबंधितास लिलावाच्या दिवशीच कळविण्यात येईल.

13. लिलावधारकास त्याच्या नावाने लिलाव अंतिम झाल्यास रु.500/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर वाळू लिलावाबाबतच्या अटी व शर्ती पालन करने याबाबतचे शपथपत्र देणे बंधनकारक राहील.

14. लिलावधारकाने संबंधित गावाकरिता मुलभूत सुविधा जसे की, महिला/पुरुष स्वच्छतागृह सुविधा, सोलर पॅनल, जिल्हा परिषद शाळेमध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा इत्यादी EMP मध्ये नमुद रक्कमेनुसार उपलब्ध करुन देणे अनिवार्य राहील. याकरिता सुरक्षा ठेव निधी म्हणून 2% बँक गॅरंटीच्या स्वरुपात या कार्यालयात जमा करावी लागेल.

सदर सुविधा संबंधित गावाला उपलब्ध करुन न दिल्यास सदरची सुरक्षा ठेव निधी (EMP COST) जप्त करण्यात येईल.

15. लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्था यांच्याकडे नियमित आयकर भरत असल्याचा पुरावा, पॅन क्रमांक, GST Certificate, Digital Signiture असणे आवश्यक राहील.

16. लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्था यांना संपूर्ण महाराष्ट्रात वाळू / रेतीघाट लिलावासंबंधाने काळया यादीत टाकले नसल्याचे स्वंघोषणापत्र देणे आवश्यक आहे.

17. ज्या वाळू / रेतीघाट धारकावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली असेल त्यांनी त्यांच्याकडे कोणतीही दंडात्मक रकमेची थकबाकी नसल्याचे स्वयंघोषणापत्र देणे आवश्यक राहील.

18. लिलावाच्या निविदा भरु इच्छिणाऱ्या व्यक्ती/संस्था यांना निविदा अर्जाचे शुल्क वाळूगटाची हातची किंमत रु.10.00 लाखापेक्षा कमी असल्यास रु. 2,000/- व रु. 10.00 लाखापेक्षा जास्त असल्यास रु. 5,000/- भरावी लागेल.

19. लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्थेला निविदेसोबत इसारा रक्कम म्हणून अपसेट प्राईजच्या 25% रक्कम लिलावात भाग घेणेपुर्वी भरावी लागेल.

20. लिलाव घेण्याची तारीख काहीही असली तरी लिलाव कालावधी वर्षाच्या (**दि.09 जुन**) रोजी संपुष्टात येईल किंवा आदेशात दिलेल्या परिमाणाचे उत्खनन संपेल यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावाधीपर्यंत अनुज्ञेय राहील. अधिसुचनेत नमूद केलेल्या अंदाजित वाळूसाठया एवढेच वाळू उत्खनन करण्यास अनुज्ञेय राहील. तसेच लिलावाचा कालावधी पावसाळयाच्या कालावधीसह समाविष्ट असेल. दि.10 जून ते 30 सप्टेंबर हा पावसाळयाचा कालावधी असेल व या कालावधीमध्ये वाळू उत्खनन करता येणार नाही. याची लिलावात भाग घेणाऱ्या सर्व लिलावधारकांनी नोंद घ्यावयाची आहे.

21. लिलावधारकाने देकाराची उर्वरित 3/4 रक्कम विहित कालावधीत न भरल्यास तसेच विहित कालावधीत करारनामा करुन न दिल्यास त्याला वाळू / रेती गटाचा ताबा देण्यात येणार नाही. अशा लिलावधारकाने शासनजमा केलेली 1/4 रक्कम जप्त करण्यात येईल व अशा वाळू / रेती गटाचा फेरलिलाव करणेत येईल.

22. वाळू / रेती (ठेका) लिलाव ज्यावेळी रद्द करण्यात येइल अशा वेळेस त्या वाळू/ रेती क्षेत्राचा नव्याने लिलाव करण्यात येईल. फेरलिलावात पूर्वीच्या लिलावाच्या किंमतीपेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पूर्वीच्या लिलावधारकाकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापि, फेरलिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक (जादा) किंमत आल्यास त्यावर पूर्वीच्या लिलावधारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.

23. 30 सप्टेंबर या कालावधीनंतर वाळू/ रेती घाटाचे तांत्रीक उपसमित्यामार्फत सर्वेक्षण करण्यात येईल व त्यानुसार वाळू/ रेती घाटामधील वाळू / रेती परिमाणाचे (लांबी X रुंदी X खोली) व त्याअनुषंगाने प्राप्त होणाऱ्या पर्यावरण अनुमतीचे अधिन राहुनच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

24. लिलावधारकास मंजुरी आदेश प्राप्त झाल्यावर संबंधीत उपअधिक्षक, भूमी अभिलेख / तहसिलदार / जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचे कडून मंजुर क्षेत्राचे सिमांकन व ताबा घेतल्याशिवाय उत्खननास सुरुवात करता येणार नाही.

25. घाटधारकाला नदीपात्रातून वाळू / रेती उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्याच क्षेत्रातून उत्खनन करता येईल व वाळू / रेती उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका निर्माण होणार नाही याची सर्व खबरदारी घाटधारकाने (लिलावधारकाने) घ्यावयाची आहे.

26. घाटधारकाने (लिलावधारकाने) गावकऱ्यांच्या निस्तार हक्कांस बाधा पोहोचविता कामा नये.

27. घाटधारकाने (लिलावधारकाने) वाळू / रेतीचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेतीबाबतची दैनंदिन हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरिक्षक, महसूल अधिकारी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरीक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत. तसेच पावत्याचा हिशोब दर महिन्याच्या 10 तारखेच्या आत जिल्हाधिकारी कार्यालय / उपविभागीय अधिकारी / तहसीलदार कार्यालयास सादर करावे

28. लिलावधारकांस वाळूची / रेतीची वाहतूक करण्यासाठी परवाना द्यावयाचा असल्यास त्याने सहकारी / सरकारी संस्था/संस्थांना प्राधान्य दिले पाहिजे.

29. वाळूची वाहतूक करताना वाहनातील वाळू ताडपत्रीने आच्छादित करुनच वाहतूक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतूक न केल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. तसेच वाहनांचे सार्वजनिक ठिकाणी तसेच वाहतुकीस अडथळा/ गैरसोय होईल अशापध्दतीने पार्कींग करु नये.

30. 1) लिलावधारक वाळू / रेतीची वाहतूक करताना वाहनासोबत सक्षम प्राधिकाऱ्याने यथोचितरित्या प्रमाणित केलेली वाहतूक पास ठेवील. वाहतूक पास तीन प्रतीत असेल, वाहतूक पासची मुळ प्रत अशा वाहतूक पासमध्ये विर्निर्दिष्ठ केलेल्या ठिकाणी असे गौण खनिज उतरवून घेतल्यानंतर खरेदीदारांकडे सुपुर्द करण्यात येईल. लिलावधारक एक प्रत 3 (तीन) वर्षापर्यंत स्वत:जवळ ठेवील. तसेच एक प्रत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जमा करेल. वाहतूक पास वाहनासोबत नसल्यास त्या वाहनातून आणलेले गौणखनिज बेकायदेशीर व अनाधिकृत असल्याचे समजले जाईल आणि त्याबाबत लागु असलेल्या कायद्याच्या प्रचलित तरतूदीनूसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 मधील नियम 48 (7) व (8) नुसार कारवाई करणेत येईल.

2) पावतीमध्ये नोंदी घेताना कार्बन पेपरचा वापर करणे अनिवार्य आहे, म्हणजेच पावतीची पहिली प्रत बॉलपेनने लिहावी व त्याखालील दोन्ही प्रति या पहिल्या प्रतिच्या व दुसऱ्या प्रतिच्या खाली कार्बन टाकून नोंद घेण्यात याव्यात. तसेच पहिल्या प्रतिच्या मागच्या बाजूवर देखील कार्बन उमटेल अशा प्रकारे डबल कार्बन वापरावा. म्हणजेच पहिल्या पावतीच्या मागे आणि दुसऱ्या व तिसऱ्या पावतीच्या समोरील बाजूवर केवळ कार्बनच्याच नोंदी राहतील, पेनच्या नोंदी

असणार नाहीत. अशा प्रकारचा कार्बन वापरुन पावती पुस्तकामध्ये नोंद आढळून न आल्यास देण्यात आलेली पावती अवैध घोषीत करुन उत्खनन केलेली व वाहतूक केलेल्या वाळू व वाहनावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

31. लिलावधारकाने त्याच्या लिलावस्थळातील वाळू / रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनास त्या वाहन क्षमते इतक्याच परिमाणाची वाहतूक पास द्यावी. वाहन क्षमतेपेक्षा अधिक परिमाणाची वाळू / रेती वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण वाळू अवैध आहे असे समजून त्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

32. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व नियमन) नियम, 2013 तसेच शासन निर्णय क्रं.गौखनि-10/0219/प्र.क्र.9/ख-1, दिनांक 03.09.2019, आणि शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले अधिनियम, नियम, परिपत्रके यामधील सर्व तरतुदीचे तंतोतंत पालन करणेची लिलावधारकाची जबाबदारी राहील. तसेच पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली (MOEF) या विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमाचे पालन करणे लिलावधारकावर बंधनकारक राहील. तसेच राज्यस्तरीय तज्ञ मुल्यांकंन समिती (SEAC) व राज्यस्तरीय पर्यावरण परिणाम व्यवस्थापन प्राधिकरण (SElAA) यांनी पर्यावरण अनुमती मंजुर करताना नमूद केलेले अटी व शर्ती लिलावधारकांवर बंधनकारक राहील.

33. वाळू वाहतुकीसाठी केंद्र शासनाच्या दिनांक 15.01.2016 च्या अधिसूचनेतील परिशिष्ट 12 मधील सनियंत्रण प्रणालीचा वापर अनिवार्य करण्यात आला असल्याने त्याप्रमाणे अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील.

34. वाळू / रेतीचे उत्खनन करताना अथवा वाहतूक करताना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.

35. लिलावधारकाने वाळू/ रेती निर्गती सुधारीत धोरण 03.09.2019, पर्यावरण अनुमती अधिसुचना दि.01.09.2016 मध्ये नमुद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौणखनिज उत्खनन नियमातील तरतूदीनुसार असलेले नियम आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदी नुसार लागु असलेल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे लिलावधारकाने वाळू / रेतीचा पूर्ण उपयोग गौण खनिज म्हणूनच केला पाहिजे.

36. वाळू / रेतीचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळून आल्यास लिलावधारकाने / ठेकेदाराने त्याबाबत विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी / उपविभागीय अधिकारी / तहसीलदार या सर्वांना 24 तासांच्या कळविले पाहिजे.

37. अंदाजित परिमाणापेक्षा अधिक वाळूसाठा / रेतीगटात असल्यास त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजित परिमाणापेक्षा अधिक उत्खनन करण्यास लिलावधारकास परवानगी राहणार नाही. तसे केल्याचे निदर्शनास आल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील नियम 48 (7) व (8) नुसार कारवाई करण्यात येईल. तसेच सदरचा वाळू ठेका रद्द करणेत येईल.

38. लिलावाने दिलेल्या क्षेत्रातुन करारात नमुद केलेल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनाच्या सहाय्यानेच वाळूचे/रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. वाळू स्थळात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळू स्थळात पाणी आहे, वाळूगटामधील वाळू मातीमिश्रीत आहे अशा तसेच मानवी वा नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळूगट बदलून दिला जाणार नाही.

39. शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय लिलावधारकास लिलाव / ठेका दुसऱ्या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही किंवा दुसऱ्या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा लिलावानंतर भागीदारीही घेता येणार नाही.

40. लिलाधारकाने त्यांना मंजुर केलेल्या वाळूघाटातून वाळूचे उत्खनन, विक्री व साठा केलेबाबत दैनंदिन हिशोब ठेवावा व त्याबाबतचे विवरणपत्र दर महिन्याच्या 10 तारखेला महिन्याचा मासिक अहवाल जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना सादर करणे सक्तीचे आहे. जे लिलावधारक मासिक विवरणपत्र विहित वेळेत सादर करणार नाहीत तसेच सादर केलेला अहवाल चुकीचा आढळून आल्यास त्यांचेविरुध्द शासनाची दिशाभुल केल्यामुळे ठेका रद्द करण्याबाबत तसेच त्यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांना असतील.

41. लिलावधारक त्यांच्या लिलाव क्षेत्रातील ज्या ठिकाणातून वाळू / रेती काढण्याने धूप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारती, घरे अथवा इतर बांधकामे पर्यावरण व शासकीय मालमत्ता यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातून वाळूचे स्वत: उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांचा उत्खनन करण्यास प्रतिबंध करण्याचा निर्णय अंतिम राहील.

42. एकदा अत्युच्च बोली स्विकारुन अंतिम करण्यात आलेल्या लिलावात कोणत्याही परिस्थितीत वाळू / रेती उत्खननाचा कालावधी वाढवून देण्याचा अथवा कोणत्याही कारणास्तव वाळूचा / रेतीचा गट बदलून देण्याची मागणी लिलावधारकास करता येणार नाही. उत्खनन केलेल्या वाळूच्या / रेतीच्या वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतूकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच वाहतूकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतूकीसाठी बंद आहेत या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत वाळू / रेती उत्खननाचा कालावधी वाढवून दिला जाणार नाही अथवा वाळू / रेती घाट बदलून दिला जाणार नाही.

43. अवैध वाळू/रेतीसाठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील नियम 48 (7) व (8) नुसार कारवाई करण्यात येईल.

44. लिलावधारकाने / परवानाधारकाने वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांची माहिती तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी यांना देण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत वाहनाच्या वहन क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसे निदर्शनास आल्यास दंडात्मक कारवाई करणेत येईल.

45. वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर सर्व बाजूने रिफलेक्टीव्ह टेप लावलेला असणे आवश्यक आहे. वाळूची वाहतुक करणाऱ्या वाहनांना एकाच प्रकारचा रंग देणे शक्य आहे का याबाबतची शक्यता तपासुन वाळू वाहतूकीसाठी एकाच प्रकारचा रंग दिलेले वाहन वापरणेत येईल.

46. वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांचे मुळ बांधणीमध्ये कोणताही बदल करण्यात येऊ नये.

47. वाळूचे/रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व लिलावधारकावर राहील. अशा हानीची / नुकसानीची परिगणना सक्षम अधिकाऱ्याकडून करण्यात येईल व त्याबाबतचा त्याचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकबाकीच्या वसूलीप्रमाणे संबंधीत लिलावधारकाकडुन वसूल करण्यात येईल. विहित केलेल्या मर्यादेच्या पलिकडे असलेल्या क्षेत्रातुन वाळूचे उत्खनन करता येणार नाही. तसेच इतर व्यक्तींच्या खाजगी मालकीच्या जमीनीतून, अशा जमिनी लिलावाने देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी वाळू/रेती काढता येणार नाही. तसेच रस्ते/पायवाट म्हणून वापरण्यात येणाऱ्या जमिनीतून वाळू / रेती काढता येणार नाही.

48. रेल्वेपुल व रस्तेपुलाच्या कोणत्याही बाजूने 600 मीटर्स (2000 फुट) अंतर सोडूनच वाळू/रेतीचे उत्खनन करण्यात यावे.

49. लिलावधारकास निश्चित करुन दिलेल्या गटापासून 500 मिटर अंतरापर्यत किंवा घाटावरुन नजरेच्या टप्प्यात येणाऱ्या क्षेत्रात वाळू / रेतीचे अवैध उत्खनन होत असल्यास लिलावधारकाने तात्काळ सबंधित तहसिलदार यांना लेखी माहिती सादर करावी. असे न केल्यास सदर उत्खनन लिलावधारकांनेच केले आहे असे गृहीत धरुन दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

50. नदी प्रवाहाचा व परिसरातील पर्यावरणाचा समतोल राखुनच मंजुर वाळू / रेतीघाटातून वाळू / रेतीचे उत्खनन करण्यात यावे.

51. पर्यावरण अनुमतीतील अटी व शर्तीचे पालन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा (EMP) नुसार पर्यावरण समतोल करिता आवश्यक खर्चाएवढी रक्कम जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करण्यात यावी व लिलावधारकाने EMP नुसार प्रत्यक्ष अमंलबजावणी केले किंवा कसे याबाबत उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियत्रंण मंडळ, यांचे ना-हरकत प्रमाणपत्र (Compliance Report) सादर केल्यानंतर तसेच लिलावातील इतर अटी व शर्तीचे पालन केलेबाबत उपविभागीय अधिकारी यांचे अहवाल प्राप्त झालेनंतर उक्त रक्कम परत करणेबाबत निर्णय घेणेत येईल.

52. जे लिलावधारक पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तीचे उल्लंघन करतील त्यांच्या बाबतीत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 अंतर्गत करावयाच्या कारवाई खेरीज, पर्यावरण संरक्षण अधिनियम, 1986 अंतर्गत कारवाई करण्यात येईल.

53. वाळू/रेती निर्गती धोरण दिनांक 03/09/2019 मधील अटी व शर्ती तसेच निविदा सूचनेतील अटी व शर्तीनुसार लिलावधारकाने लिलावात भाग घेण्यापूर्वी, वाळू स्थळात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच, परवानगी दिलेल्या साधनांच्या सहाय्याने वाळूचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची आहे. वाळूगटात पाणी आहे, मातीमिश्रीत वाळू आहे याची लिलावापूर्वी खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधित लिलावधारकाची राहील. वाळू उत्खननासाठी सक्शन पंपाची परवानगी मिळाली नाही अशा कारणास्तव लिलावाच्या रकमेचा परतावा अनुज्ञेय असणार नाही. वाळू/रेती गटाचा ताबा घेऊन लिलावधारकाने वाळूचे उत्खनन केल्यानंतर यासंबंधीची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच वाळूगट बदलून देण्याची किंवा वाळू लिलावापोटी शासन जमा केलेल्या रकमेपैकी प्रमाणशीर रक्कम परत करण्याच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

54. लिलाव मंजुरीचे आदेश निर्गमित केल्यानंतर लिलावधारकाने वाळूगटाचा ताबा 7 दिवसांच्या आत घेतला पाहिजे. लिलावधारकास वाळूगटाचा ताबा देताना तसेच ताबा परत घेताना तहसीलदार किंवा जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्या समक्ष व्हिडीओ चित्रीकरण तसेच पंचनामा करणेत येईल व त्याची सी.डी. तहसीलदार मार्फत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे ताबा दिल्याच्या अहवाला सोबत जमा करावी. वाळूगटात खडडे असल्यास त्याचा उल्लेख पंचनाम्यामध्ये करणेत येईल व याबाबतचे व्हिडीओ चित्रीकरणही करणेत येईल.

55. लिलावधारकांस सर्वेक्षण शुल्कापोटी रु.5000/- इतक्या रकमेचा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, सोलापूर यांचे नावे काढण्यात आलेला राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डी.डी) सर्वेक्षण शुल्कापोटी जमा करावा लागेल.

56. लिलावधारकाने/परवाना धारकाने त्याला मंजुर केलेल्या वाळूगटाच्या ठिकाणी फलक लावून उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करुन सीमा दर्शविणारे खांब उभारणे अनिवार्य राहील. विहित केलेल्या क्षेत्राच्या बाहेर वाळू/रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच लिलावधारकाने जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगीने सदर वाळूगटाचे कामकाज पाहण्यासाठी नियुक्त केलेल्या उपठेकेदार, व्यवस्थापक व कर्मचारी यांची नावे, पत्ता व जागेचा तपशील दर्शविणारा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक राहील.

57. मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका (सी) क्र. 19628-1629/2009 मध्ये दि.27/02/2012 रोजी दिलेले आदेश तसेच नदीपात्रातील पाणी स्वच्छ व शुध्द राहण्यासाठी व नैसर्गिकरित्या पाण्याचे नदीपात्रात वहन होण्यासाठी वाळू / रेती गटातुन जास्तीत जास्त 3 मी किंवा पाण्याची पातळी यापैकी जे कमी असेल तितक्या खोलीपर्यंत तसेच वाळू/रेती निर्गती धोरण दिनांक दि.03/09/2019 नुसार तहसिलचे तांत्रिक उपसमितीने संबंधित वाळू / रेतीघाटाच्या थराची जाडी निश्चित केली आहे व पर्यावरण मंजुरी आदेशामध्ये जी खोली शिफारस आहे, त्यामर्यादेत वाळू / रेतीचे उत्खनन करता येईल.

58. नदीपात्रातील वाळू थराची जाडी सातत्याने राहण्यासाठी बेंच मार्क निश्चित करुन बेंच मार्कच्या खाली कोणत्याही परिस्थितीत वाळूचे उत्खनन करता येणार नाही. निश्चित केलेले बेंच मार्क पडणार नाहीत. तसेच नदीपात्रातील वाळूच्या थराच्या आधारे आजूबाजूच्या विहिरीतील पाण्याची पातळी कमी होणार नाही या बाबत योग्य ती दक्षता लिलावधारकाने घेणे आवश्यक राहील.

59. लिलावधारकाने वाळू उत्खनन करीता एकुण मंजूर क्षेत्रापैकी 75% क्षेत्राफळापेक्षा जास्त नाही अशा क्षेत्रामध्ये उत्खनन करणे आवश्यक राहील.

60. लिलावधारकास लिलावात मंजुर केलेल्या वाळूसाठया इतकेच उत्खनन करता येईल.

61. वाळू/रेतीचे उत्खनन / वाहतुक सकाळी 6.00 ते सायंकाळी 6.00 या कालावधीतच करता येईल. या कालावधी व्यतिरिक्तच्या काळात केलेले उत्खनन / वाहतुक अवैध समजून कारवाई करण्यात येईल.

62. कोल्हापूर पध्दतीचे बंधारे असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग / विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक असेल.

63. सार्वजनिक पाणवठा / पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून 100 मीटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढ्या अंतरापलिकडे उत्खनन करणे आवश्यक राहील.

64. लिलावधारकास नदीपात्रामध्ये वाळू वाहतूकीसाठी मोठी वाहने नेता येणार नाहीत. लिलावधारकाने वाळूगटाच्या नजीकच्या मुख्य रस्त्यावर डेपो तयार करुन वाळू गटामधून उत्खनन केलेली वाळू सदर डेपोमध्ये साठवून विक्री करावी. डेपोपर्यंतच्या वाळू वाहतूकीसाठी ट्रॅक्टर - ट्रालीचा वापर करावा. ज्या ठिकाणी प्रत्यक्ष नदीपात्रातुन वाळू उत्खननाच्या ठिकाणी सीसीटीव्ही लावणे अनिवार्य आहे. तसेच वाळू डेपोमध्ये सीसीटीव्ही लावणे अनिवार्य असून, त्याचे पंधरा दिवसांचे फुटेज पंधरवडा संपल्यानंतर 10 दिवसात तहसिलदार / उपविभागीय अधिकारी / जिल्हाधिकारी यांना सादर करणे बंधनकारक राहील.

65. वाळु उत्खननासाठी लिलाव किंवा परवाना देण्यामागे वाणिज्यिक किंवा महसूल मिळविणे हा एकमेव उद्देश नसून, विकास कामासाठी आवश्यक वाळू उपलब्ध व्हावी हा प्रमुख उद्देश आहे. तसेच नदीपात्रात वाळू साठल्याने आजुबाजुच्या परिसरात पुरसदृश्य परिस्थिती उद्‌भवू नये म्हणून वाळूचे उत्खनन केले जाते. लिलावधारकास लिलाव मंजुर केल्यानंतर किंवा परवाना दिल्यानंतर लिलावधारकाने/परवानाधारकाने वाळूगटाचा ताबा दिल्याच्या दिनांकापासून एका आठवड्याच्या आत वाळू/रेतीचे उत्खनन सुरु करणे आवश्यक राहील.

66. अवैध उत्खनन अधिक प्रभावीपणे रोखण्याकरिता लिलावधारकांनी त्यांना देण्यात आलेले वाळू / रेतीघाटच्या परिसरातील जे वाळू / रेतीघाट लिलावात जाणार नाही, त्या वाळू / रेतीघाटात प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यासाठी जो खर्च शासनास येईल त्याबाबतचा आर्थिक भार त्यांनी (लिलावधारक / परवानाधारक) उचलावा.

जेणेकरुन अवैधपणे वाळू / रेती उपलब्ध होण्याचे प्रमाण कमी होऊन अधिकृत लिलावधारकाकडून वाळू / रेतीची खरेदी नियमानुसार होईल.

67. नदीपात्रात निश्चित केलेल्या वाळूगटातून वाळूचे उत्खनन **हाताने** (Manually) करावे लागेल. नदीपात्रातील वाळू/रेती उत्खननासाठी तसेच नदीपात्रातील वाळू वाहनात भरण्यासाठी पोकलेन, जेसीबी इ. प्रकारच्या कोणत्याही यांत्रिक साधनांचा वापर अनुज्ञेय नाही. यांत्रिक साधनाद्वारे उत्खनन केल्याचे निर्दशनास आल्यास ते उत्खनन अवैध समजून दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

68. वाळूचे उत्खनन फक्त मनुष्यबळाचे सहाय्याने करणे बंधनकारक राहील. त्यासाठी कोणत्याही यांत्रिक साधनांचा वापर करता येणार नाही. मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांच्या आदेशानुसार पाण्याखालील व वाहत्या पाण्याखालील वाळूचे उत्खननन करता येणार नाही. तसे केल्यास मा.राष्ट्रीय हरित लवाद अधिनियम-2010, पर्यावरण सरंक्षण अधिनियम-1986 नुसार कायदेशीर कारवाई करणेत येईल.

69. लिलावधारकाकडुन वाहतुक करण्यात येणाऱ्या वाळूच्या वाहनासोबतच्या वाहतुक पासची तपासणी संबंधित गावच्या ग्रामसेवक व सरपंच यांना सुध्दा करता येईल. वाहनासोबत वाहतुक पास नसेल किंवा वाहतुक पासमध्ये खाडाखोड असेल, दिनांक व वेळ चुकीचा असेल अशा त्रुटी आढळुन आल्यास त्याबाबतची माहिती तहसीलदार यांना ग्रामसेवक / सरपंच यांचेकडुन देण्यात आल्यानंतर त्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

70. ग्रामपंचायतीने वाळूच्या अवैध उत्खननास आळा घालण्यासाठी लिलावधारकांमार्फत लिलावाच्या अटी व शर्तीप्रमाणे उत्खनन होत आहे किंवा कसे, याची पाहणी करणे व अटी व शर्तीचे उलंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यास तहसिलदार, उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी यांना त्यासंबंधीची माहिती देणे आवश्यक राहील.

71. लिलावधारकांनी आपापसात संगनमत केल्यास, ठराविक वाळू घाटांचा लिलाव पुन्हा पुन्हा लावून सुध्दा कोणीही लिलावधारक बोली बोलण्यास पुढे येत नाहीत व त्यामुळे वाळू घाटांचा लिलाव होऊ शकत नाही. अशा प्रकारे संगणमत करुन शासनाच्या महसूलाचे नुकसान करणाऱ्या तसेच अवैध उत्खनन व वाहतूकीसारखे गुन्हे करणाऱ्या लिलावधारकास संपूर्ण राज्यासाठी काळ्या यदीत (Black List) टाकण्यात येईल.

72. पर्यावरण अनुमतीमध्ये परवानगी दिलेल्या खोलीपेक्षा जास्त खोल उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास लिलावधारक/परवानाधारकाकडून घेण्यात आलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन, लिलाव/परवाना रद्द करण्यात येईल, तसेच असे उत्खनन अवैध ठरवून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 मधील कलम 48 (7) व (8) मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

73. वाळू/रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनचालकाकडे वैध बारकोडयुक्त वाहतूक पास आढळला नाही किंवा वाहतूक पासचा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर वाळूचे उत्खनन/वाहतूक अवैध समजुन त्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 मधील कलम 48 (7) व (8) मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

74. अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणामध्ये संबंधीत ठेकेदार/लिलावधारक दोषी आढळल्यास त्यांच्याविरुध्द प्रचलित नियमानुसार कारवाई करण्यात येईल. प्रचलित नियमानुसार कारवाई करतांना संबंधिताविरुध्द भारतीय दंड विधी संहिता कलम, 34, 114, 379, 392, 393, 394, 396 इ. कलमांतर्गत गुन्हा दाखल करणे, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 मधील कलम 48 (7) मधील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करणे व कलम 48 (8) मधील तरतुदीनुसार वाळू उत्खननासाठी वापरलेली यंत्रसामग्री व वाहतूकीसाठी वापरलेली वाहने जप्त करणे, अवैध उत्खनन केलेली वाळू जप्त करणे इत्यादी कारवाई करण्यात येईल व पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील. तसेच महाराष्ट्र गौणखनिज अधिनियम-1955 मधील तरतुदी व गौणखनिजाच्या संबधांने केंद्र अथवा राज्य शासन वेळोवेळी लागू करील असा इतर कोणत्याही अधिनियमाचे काटकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

75. अवैध वाळू उत्खनन व वाहतुक प्रकरणी कारवाई करताना महसुल अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर हल्ले होत असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा अशा ठिकाणी संघटीत गुन्हेगारीचे प्रकार आढळून आल्यास अशा संघटीत गुन्हेगारीविरुध्द "महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्ये विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत आधिनियम, 1981 अधिनियमान्वये कारवाई करण्यात येईल.

76. लिलावधारक/परवानाधारक यांनी पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तीचे तसेच पर्यावरण विषयक नियमातील तरतूदींचे पालन करणे बंधनकारक असेल. सदर तरतूदींचे उल्लंघन झाल्यास ते पर्यावरण (संरक्षण) अधिनियम-1986 मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील.

77. लिलावधारक यांना नदीतील वाळू घाटामध्ये उत्खनन केलेल्या वाळूची उत्खनन, वाहतुक अथवा साठवणुक राखीव वन गटामधुन करता येणार नाही. लिलावधारक सदर गटामधुन वाळूचे वाहतुक अथवा साठवणूक केलेस त्यांचेवर भारतीय वन अधिनियम-1927 तसेच वन (संवर्धन) अधिनियम-1980 अन्वये कारवाई करणेत येईल.

78. 1) प्रत्येक वाळूगटांमधील वाळू वाहतूकीसाठी एकच रस्ता ठेवण्यात यावा. उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळूची/ रेतीची साठवणूक, ई-निवीदा/ई-लिलाव ज्या जिल्हाधिकाऱ्यानी / अपर जिल्हाधिकाऱ्यानी केला असेल त्याच जिल्हयात करावी लागेल व त्यासाठी अकृषिक परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी ई-निवीदा/ई-लिलावधारकाची असेल. सदर वाळू साठविण्यासाठी एकच सलग जागा ठरविता येईल. त्यानुसार ते ठिकाण नदीपात्रापासून नजीकच्या मुख्य रस्त्यावर डेपो तयार करावे. सदरच्या क्षेत्रात नदीपात्रातून जाण्यासाठी एकच आणि नदीक्षेत्रातून बाहेर रस्त्यावर पडण्यासाठी एकच मार्ग असेल आणि उर्वरित सर्व क्षेत्र अशाप्रकारे बंद करावे लागेल की ज्यामुळे तेथे एकही वाहन आत किंवा बाहेर जावू शकणार नाही. यासाठी लाकडी/तारेचे/लोखंडी/भिंतीचे/दगडाचे कुंपन किंवा मोठमोठी दगडे जी हलविता येणे अशक्य आहे ती ठेवणे किंवा खंदक/ चर खोदणे आवश्यक असेल. वाळू/रेती ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळू/रेतीचे उत्खनन केलेले आहे. त्या वाळूचा/रेतीचा साठा लिलावाच्या उत्खननाची मुदत संपल्यानंतर 10 दिवसात उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल. व

अशा वाळूच्या/ रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत ई-निविदाधारकास (e-Tendering) / ई-लिलावधारकास (e-Auction) कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही. तसेच लिलावाचा कालावधी संपल्यानंतर त्यानंतरचे मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाळू/रेती साठा करण्यास परवाना दिला जाणार नाही किंवा त्याच्या वाहतुकीसाठी दुय्यम वाहतुक पासेस देण्यात येणार नाहीत. वर नमुद केलेनुसार वाळू वाहतुकीसाठी जाणे येणेचा रस्ता कोणत्याही परिस्थितीत वन जमिनीतुन होणार नाही अथवा वाळू साठवणूक वन जमिनीवर होणार नाही.

2) वाळूस्थळातून वाळू उत्खनन केलेनंतर शिल्लक राहिलेली खडवाण नदीपात्रामध्ये टाकुन नदीपात्र सपाट करण्याची जबाबदारी संबंधित लिलावधारकाची राहील. लिलावधारकाने लिलावाची मुदत संपल्यानंतर नदीपात्राचे सपाटीकरण 1 महिन्यात न केल्यास भविष्यात होणाऱ्या अपघातास अथवा घडणाऱ्या परिणामास लिलावधारक सर्वस्वी जबाबदार राहतील. तसेच लिलावापोटी जमा केलेली अनामत रक्कम जप्त करणेत येईल.

79. लिलावधारकाने त्याच्या लिलाव स्थळातील वाळू / रेती वाहतुक करणाऱ्या वाहनास मोटार वाहन कायदा-1988 नुसार अनुज्ञेय परिमाणाची व सलग क्रमांकाची वाहतुकीची पावती द्यावी. सदर पावती स्कॅनरगनने स्कॅन करुनच देण्यात यावी. स्कॅनगन व त्याबाबतचे स्फॉटवेअर लिलावधारकास स्वत: घेणे बंधनकारक राहील.

80. वाळू ठेकेदारांनी खाली क्रमांक a, b, c & d मध्ये नमूद केल्यानुसार सॉफ्टवेअर परस्पर तयार करुन वापरावे लागेल. तथापि website आणि त्याच्यामधील data हा secure असला पाहिजे आणि सर्व अधिकाऱ्यांना त्यामध्ये कायम access असला पाहिजे. तथापि, त्यात खाली नमूद सुविधा (Features) असणे आवश्यक राहील. यापेक्षा वेगळया व अधिक चांगल्या प्रकारच्या सुविधा असणारे सॉफ्टवेअर वापरण्यास हरकत नाही. मात्र त्या सुविधा (Features) नमूद केलेल्या सुविधा पेक्षा अधिक चांगल्या कशा आहेत ते वाळू ठेकेदारास लेखी कळवावे लागेल आणि त्याबद्दल वेगळी परवानगी घ्यावी लागेल.

a) सॉफ्टवेअर हे ऑनलाईन राहील, ऑफलाईन नाही. तसेच सॉफ्टवेअरमध्ये (संबंधित वेबसाईटमध्ये) संबंधित वाळु ठेक्याबद्दलची सर्व मुलभूत माहिती सुरुवातीलाच नोंदविली गेली पाहिजे.उदाहरणार्थ :-
   - i) वाळु ठेक्याची जागा
   - ii) वाळु ठेकेदाराचे नाव
   - iii) ठेक्याचा कालावधी, उत्खनन व वाहतुकीची वेळ.
   - iv) एकूण उचलण्यासाठी मंजुर करावयाचा साठा इत्यादी
   - v) ठेका मंजूरी आदेश क्रमांक
   - vi) सॉफटवेअरमध्ये वाळू ठेक्याचा पुर्ण हिशोब ठेकेदार निहाय / ऑर्डर निहाय असण्याची व्यवस्था असावी.
   - vii) इत्यादी, वरील सर्व डाटा बारकोड स्कॅन केल्यानंतर संगणकात ऑनलाईन उपलब्ध व्हावा.

b) वाहतूकदाराला वाळू विकताना संबधित ठेकेदारांने बारकोडेड पावती स्कॅन करुन ऑनलाईन जनरेट झालेला युनिक क्रमांक पावतीवर टाकावा व स्वाक्षरी करावी. सदर युनीक कोड जनरेट होण्यापूर्वी पुढील माहिती संगणकात ऑनलाईन अद्यायावत करणे आवश्यक राहिल.

i) वाहन क्रमांक

ii) वाहन चालकाचे नांव व मोबाईल क्रमांक

iii) वाहनचालकाचे ड्रायव्हिंग लायसन्स नंबर

iv) वाहन परवाना (परमीट) क्रमांक

v) एकुण ब्रास

vi) वाळू जेथे नेण्यात येणार आहे ते ठिकाण

vii) इतर आवश्यक माहीती

c) अशा प्रकारे प्रत्येक पावतीची नोंद करताना त्यासाठी भरण्यात आलेली माहिती ही आपोआप मध्यवर्ती (central) सर्व्हरवर नोंद झालेली असावी जेणेकरुन ती माहिती जिल्हाधिकारी आणि अधिनस्त असणारे सर्व अधिकारी यांना वेळोवेळी पाहता येईल.

d) याशिवाय जिल्हाधिकारी वेळोवेळी सांगतील त्या अटी व नियम (Features) लिलावधारकांवर बंधनकारक राहतील.

e) वाळू भरलेली गाडी वाळू ठेक्यावरुन सोडताना प्रथम त्याला देण्यात आलेली पावती स्कॅनिंग करुन घ्यावी अन्यथा पावती अवैध समजण्यात येईल. ज्यांना वाळू विकली ते कोणत्या गावाला वाळू घेऊन जाणार त्याचे स्थानही पावती देताना नमुद करणे आवश्यक आहे.

81. प्रत्येक वेळी ठेक्यावर व वाळू वाहतुकीचे रस्त्यावर व वाळू साठवणुकीचे ठिकाणी 24 X 7 तास चालणारे CCTV Camera बसविणे आवश्यक राहील. किमान 10 सी.सी.टी.व्ही. कॅमेरा लावणे आवश्यक आहे. सदर CCTV Camera अशा पध्दतीने बसवावे की त्यात पुढील सर्व जागा cover होतील.

I. ज्याठिकाणी पावती फाडण्याचे काम होते ती जागा.

II. वाळु ठेक्याच्या स्थळावरुन आणि वाळू साठविण्याच्या जागेवरुन ज्या ठिकाणाहून गाडया बाहेर निघू शकतात व आत जाऊ शकतात अशा सर्व मार्गावर (entry & exit points), वाळूगटातील वाळूची वाहतूक करणारी सर्व वाहने गावातील ज्या ठिकाणावरुन ये-जा करतात ते ठिकाण, ज्या ठिकाणी वाळू उत्खनन होते व गाडया भरल्या जातील अशा जागी अशाप्रकारे CCTV Camera लावणे आवश्यक आहे की, त्यात वाहनांचा गाडी क्रमांक त्यामध्ये नोंदविला जाईल. सर्व ठेके सुरु झाल्यापासून ते संपेपर्यंत संपूर्ण ठेक्याचे बॅकअप कायमस्वरुपी जतन केले जाईल.

III. वाळु ठेक्याची संपूर्ण जागा cover होतील अशा उंच ठिकाणी CCTV Camera लावावेत की जेणेकरुन संपूर्ण जागा cover करता येईल.

IV. CCTV Camera चे resolution इतके जास्त राहिल की, माणसांचे चेहरे स्पष्टपणे ओळखता आले पाहिजेत आणि गाडयांचे नंबरही स्पष्टपणे दिसले पाहिजे. सर्व ठिकाणी बसविलेल्या CCTV ची किंमत लिलावधारकांना सोसणे आवश्यक राहील.

82. प्रत्येक वाळुसाठयातुन बाहेर निघण्यासाठी नदीपात्राच्या दोन्ही बाजुला तहसीलदार मान्यता देतील तेवढेच entry & exit points (आत व बाहेर निघण्याचे मार्ग) असतील. एका स्पॉटवर नदीच्या एका बाजूला जास्तीत जास्त 1 मार्गाची परवानगी देण्यात येईल. (आत येणारा एक व बाहेर जाणारा एक मार्ग) याशिवाय इतर मार्ग वाळूस्थळांच्या ठिकाणी असल्यास ते अशा पध्दतीने बंद करावे लागतील की, त्याठिकाणाहुन कोणत्याही वाहनांची वाहतूक करणे शक्य होणार नाही. त्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना ठेकेदारांनी स्वत: करावी. उदा.मोठे बोल्डर टाकणे, चऱ्या खोदणे, इ. ठेकेदाराने / लिलावाधाराकाने स्वत:च्या खर्चाने करणे आवश्यक आहे. तथापि, एखादया वाळू स्थळाच्या ठिकाणी यापेक्षा अधिक रस्ते आवश्यक असल्याचे निदर्शनास आणून दिल्यास त्यावर विचार करण्यात येईल. मात्र अंतिम निर्णय जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांचा राहील.

83. लिलावधारकांनी बसविलेल्या CCTV चा Address तहसीलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी, मा.विभागीय आयुक्त व शासनाच्या महसूल व वनविभागाकडे देणे आवश्यक राहील. लिलावधारकाने वाळू उत्खनन व वाहतूकीचे मागील 15 दिवसांचे छायाचित्रण असलेली त्यानंतर लगतच्या कालावधीची सीडी दर 10 दिवसांनी तहसिलदार / उपविभागीय अधिकारी कार्यालय / जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करणे अनिवार्य राहील. सदरचे छायाचित्रण स्पष्टता ही चांगल्या प्रतीचे (HD Quality) ची असणे आवश्यक आहे.

84. तपासणीत CCTV कॅमेरा काही काळासाठी बंद असल्याचे निदर्शनास आल्यास, मंजूर वाळूसाठा व वाळू उत्खननासाठी उपलब्ध दिवस यानुसार दरदिवशी करावयाचे उत्खनन विचारात घेऊन, जेवढे दिवस CCTV कॅमेरा बंद होता, तेवढे दिवस सरासरी उत्खनन केले, असे गृहीत धरुन लिलावाच्या रकमेनुसार प्रतीब्रास रक्कम परिगणीत करुन त्या दराने CCTV कॅमेरा बंद असलेल्या कालावधीत उत्खनन केलेल्या वाळूच्या रकमेएवढी दंडात्मक रक्कम लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल. एखाद्या दिवशी कितीही कालावधीसाठी CCTV बंद असला तरीही पूर्ण दिवसासाठी CCTV बंद असल्याचे समजून वरील प्रमाणे दंडात्मक रकमेची आकारणी व वसूली करण्यात येईल.

85. लिलावधारकाने वाळू उत्खनन ठिकाणावरुन वाळू साठाच्या ठिकाणापर्यंत वाळू / रेतीची वाहतुक करणाऱ्या प्रत्येक वाहनांवर जी.पी.एस बसविणे आवश्यक राहील. वाळू / रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनामध्ये GPS न बसविल्यास बारकोड टि.पी. चे Invoice Generate होणार नाही.

86. वाळुस्थळावर संगणक इंटरनेट कनेक्शन आणि किमान 24 तासाचे बॅकअप असणारे इन्व्हर्टर किंवा अखंडीत वीज पुरवठयाची सुविधा असणे आवश्यक आहे. सदर सर्व सेटअप एका तात्पुरत्या किंवा कायमस्वरुपी पुरविण्यात आलेल्या बंद खोलीमध्ये असावेत जेणेकरुन ऊन, वारा व पाऊस यापासून त्याचे संरक्षण होईल. सदर संगणक हे 24 तास/पूर्ण वेळ इंटरनेटशी जोडलेले असले पाहिजेत व ते सुस्थितीत असणे आवश्यक राहील.

87. वाळू स्थळावर नाईट व्हीजन CCTV कॅमेरे व रात्रीच्या वेळेस उघडया डोळयांनी दिसेल अशा प्रकारची प्रकाश व्यवस्था (उदा.हॅलोजन लाईटची) करण्यात यावी.

88. लिलावधारकाकडे तहसिलदारांनी प्रमाणित करुन दिलेली भेटवही ठेवणे बंधनकारक असेल. तलाठयाने व इतर सक्षम प्राधिकारी यांनी वाळूघाटास भेट दिल्यांनतर दैनंदिन भेट वहीमध्ये त्यांची नोंद करुन दिनांकित स्वाक्षरी घेणेत यावी.

89. वाळू/रेती निर्गतीबाबत अथवा त्याअनुषंगाने यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय, शासन ज्ञापन, शासन परिपत्रक अथवा शासन पत्रान्वये देण्यात आलेले आदेश, सूचना जर दिनांक 03/01/2018 च्या वाळू/रेती निर्गती सुधारीत धोरणातील काही तरतुदींशी विसंगत असतील तर अशा प्रकरणी दिनांक 03/09/2019 च्या वाळू/रेती निर्गती सुधारीत धोरणातील तरतूदी अंतिम समजून त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

90. लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत ठेका नैसर्गिक कारणास्तव, न्यायालयीन प्रक्रियेत किंवा नियमांचे उल्लंघन प्रकरणी रद्द केल्यास किंवा लिलावधारकास वाळू/रेती उत्खनन करण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही.

91. वाळू / रेती वाहतूकीकरिता वापरण्यात येणारे रस्ते / मजुर / वाहने यांचे देखरेखीची / संरक्षणाची जबाबदारी लिलावधारकाची राहील. कोणत्याही प्रकारचा अपघात घडलेस त्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील.

92. वाळू / रेतीघाट शासकीय कामाकरिता शासकीय विभागास राखीव करिता असल्यास उत्खनन केलेली वाळू / रेती शासकीय कामावर/प्रकल्पावर वापरणे बंधनकारक राहील.

93. EMP व Mine Closure Plan मधील प्रस्तावित उपाययोजना राबविण्याबाबत व त्यांच्या अंमलबजावणीकरिता लागणारा खर्च रेतीघाट धारकास करावयाचा असल्यामुळे सदर रक्कम सुरक्षा ठेव निधी म्हणून बँक गॅरंटीच्या स्वरुपात जिल्हाधिकारी कार्यालयास जमा करणे बंधनकारक राहील. व त्याबाबतचे हमीपत्र जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे अनिवार्य राहील. राबविण्यात आलेल्या उपाययोजना व त्यांच्या अंमललबजावणीकरीता लागणारा खर्च न केल्यास सदरची सुरक्षा ठेव निधी (EMP COST) जप्त करण्यांत येईल. आदेशात नमुद / मंजुर खोलीपेक्षा जास्त उत्खनन करणार नसल्याचे हमीपत्र देणे बंधनकारक राहील तसेच मंजुर खोलीपेक्षा जास्त उत्खनन न होण्याकरिता आवश्यक बेंच मार्क खाणकामाच्या जागेवर तयार करणे अनिवार्य राहील.

94. <u>पर्यावरण विभागाने मंजुर केलेल्या पर्यावरण व्यवस्थापन आराखडयात नमुद केलेप्रमाणे रक्कम अदा करणे आवश्यक राहील व सदर सर्व रक्कमा किती भराव्या लागतील याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर (गौणखनिज) येथून</u>

माहिती प्राप्त करुन करणे आवश्यक राहील. याव्यतिरिक्त शासनाकडून शासन देय रक्कमाबाबत कोणतेही फेरबदल केल्यास ते सर्व लिलावधारकास बंधनकारक राहील.

95. पर्यावरण दुषित होण्यापासून थांबविण्याकरिता EMP मध्ये समाविष्ट असलेल्या Mobile toilets, Water sprinkler, Solid Waste Management इ. व्यवस्थापन करणे आवश्यक राहील. तसेच वाहतूकी दरम्यान खराब होणाऱ्या रस्त्याची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी घाटधारकाची राहील.

96. पर्यावरण विभागाने सदर रेतीघाटाकरिता पर्यावरण विषयक मंजुरी (Environment Cleareance) प्रदान केलेली असून त्यात नमुद सर्व साधारण अटी व शर्ती (General Condition) तसेच विशिष्ट अटी व शर्ती (Specific Condition) वाळू / रेतीघाट धारकास बंधनकारक राहतील व त्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी वाळू / रेतीघाट धारकाची राहील.

97. नदीपात्र अथवा त्याच्या परिसरातील वनस्पती व प्राणी यांचे नैसर्गिक रहिवास व प्रजननन यांना कोणताही धोका पोहोचणार नाही याची खबरदारी लिलावधारकानी घ्यावी.

98. पर्यावरण अनुमतीतील अटी व शर्ती नुसार ठेका दिलेल्या एकुण क्षेत्रा इतक्या क्षेत्रावर नदीकाठी अथवा अन्य ठिकाणी वृक्ष लागवड करावयाची आहे. पर्यावरण व्यवस्थापन आराखडा नुसार वृक्षारोपण व इतर बाबींची अंमलबजावणी लिलावधारकांनी करावी अन्यथा EMP करीता बॅक गॅरंटीची रक्कम शासन जमा करण्यात येईल.

99. Siltation Study केल्यानंतर जमीनीची धुप थांबविणेसाठी सुचविणेत आलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी ठेकेदाराने स्वत: विनाशर्त व विनामोबदला करावयाची आहे. तसेच उत्खनन व वाहतुक करताना जमिनीची धूप होणार नाही याची खबरदारी घ्यावयाची आहे.

100. वाळू / रेती उत्खननामुळे त्याखालील जमिनीच्या गुणधर्मावर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता ठेकेदाराने घ्यावयाची आहे.

101. वाळूच्या उत्खननामुळे पाण्याच्या प्रवाहातील गढूळपणा (Turbidity), वेग व प्रवाहाचा मार्ग यामध्ये कोणताही बदल होणार नाही याची दक्षता ठेकेदारांनी घ्यावयाची आहे.

102. मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश व मा.राष्ट्रीय हरीत न्यायाधीकरण (National Green Tribunal) यांचे आदेश, Sustainable Sand Mining Guaidines 2016, Sand Mining Framework 2018, Enfrocement and Monitoring Guidelines for Sand Mining January-2020 मधील सुचना तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालय व पर्यावरण अनुमतीमध्ये समाविष्ट असलेल्या अटी व शर्तीनुसार वाळू / रेती उत्खननासाठी वापरायची साधने जिल्हास्तरीय समिती निश्चित करेल अशा पध्दतीने वाळुचे उत्खनन करावे लागेल. तसेच उक्त अधिनियमातील अटी, शर्ती व तरतुदी लिलावधारकास बंधनकारक राहील.

103. सांडपाणी निर्माण होत असल्यास त्यावर पर्यावरण व वन्यजीव संरक्षण मंत्रालय, भारत सरकार तसेच प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी विहीत केलेल्या प्रमाणकानुसार प्रक्रिया करणेत यावी.

104. उत्खनन केलेली वाळू/रेती वाहतूक करण्याकरिता वापरण्यात येणारी वाहने सुस्थितीत ठेवणे व त्यासाठी PUC Certificate घेणे बंधनकारक राहील. PUC Certificate नसलेली वाहने वाळू वाहतूकीकरिता वापरता येणार नाही. वाळू उत्खनन व वाहतुकीसाठी वापरणेत येणाऱ्या यंत्रातील इंधन / ग्रीस गळतीमुळे प्रदुषण होणार नाही किंवा पाणी दुषित होणार नाही तसेच ध्वनी प्रदुषण होणार नाही याची दक्षता लिलावधारकाने घ्यावयाची आहे. सदरील बाबीचे उल्लंघन केल्यास लिलावधारक दंडास पात्र राहतील.

105. उत्खनन स्थळावरील तसेच त्याजवळ असलेल्या वस्तीजवळील वातावरणाच्या हवेची गुणवत्ता ही दरवर्षी जानेवारी, एप्रिल व नोव्हेंबर या महिन्यामध्ये तपासण्यात येईल याची गुणवत्ता ही केंद्रिय पर्यावरण व वन्यजीव संरक्षण मंत्रालय भारत सरकार यांनी ठरवून दिलेल्या मानकाप्रमाणे असणे आवश्यक आहे व सदरील अहवाल देणेची सर्व जबाबदारी लिलावधारकाची राहील.

106. EMP नुसार बाबनिहाय खर्चाची मासिक विवरण संबंधित लिलावधारकांनी दरमहा तहसिल कार्यालय, ग्रामदक्षता समितीकडून प्रमाणित करुन जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावे.

107. केंद्र शासनाच्या Enforcement & Monitoring Guidelines 2020, व पर्यावरण वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली (MOEF) या विभागाने वेळोवेळी निर्गमित केलल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील.

108. Project Proponent म्हणून प्रकरणपरत्वे राज्यस्तरीय समितीसमोर पर्यावरण अनुमतीचे प्रस्ताव सादर करणाऱ्या जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचे नावाने पर्यावरण अनुमती प्राप्त झालेली आहे. परंतू संबंधित लिलावधारकांकडून वाळूचे उत्खनन करण्यात येत असल्यास पर्यायाने पर्यावरण अनुमतीमधील नमुद सर्वसाधारण अटी व शर्ती तसेच विशिष्ट अटी व शर्ती वाळू / रेतीघाट लिलावधारकास बंधनकारक राहतील व त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी वाळू / रेतीघाट धारकांची राहील. त्यामुळे जे वाळूगट लिलावात जातील त्यांच्या बाबतीत संबंधित यशस्वी लिलावधारकांच्या नावे पर्यावरण अनुमती वर्ग राहील. तसेच पर्यावरण अनुमती **परवानगी निर्गमित दिनांकापासुन त्या-त्या वर्षीच्या 9 जुन पर्यंतच वैध असेल.** दि.10 जून ते 30 सप्टेंबर हा पावसाळयाचा कालावधी असेल व या कालावधीमध्ये वाळू उत्खनन करता येणार नाही. पुढील प्रत्येक वर्षाकरिता लिलाव कालावधीसाठी पर्यावरण अनुमतीचा प्रस्ताव Project Proponent म्हणून राज्यस्तरीय पर्यावरण समितीसमोर सादर करुन पर्यावरण अनुमती प्राप्त झालेनंतर संबंधित लिलावधारकाच्या नावे पर्यावरण अनुमती वर्ग करणेत येईल.

109. सदर वाळू / रेतीघाटातून झालेल्या / केलेल्या उत्खननाबाबतचा पंधरवडा अहवाल त्यानंतरचे 10दिवसांनी तहसील कार्यालय / उपविभागीय अधिकारी / जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे अनिवार्य राहील.

110. परवान्यात मंजुर केलेला वाळू / रेतीसाठा काढुन संपल्यावर किंवा परवान्यात परवान्याची मुदत संपल्यानंतर परवानाधारक परवाना आणि काढुन घेण्यात आलेल्या खनिज मालाचे परिमाण, वाहतुकीचे व ज्यांना माल विकण्यात आला त्या पक्षकाराचे नाव व त्यासाठी मिळालेली किंमत यांचे तपशिल दर्शविणारे संपुर्ण विवरणपत्र सक्षम प्राधिकाऱ्याला सादर करेल आणि सक्षम अधिकाऱ्याने छाननी करण्यासाठी मागणी केल्यानुसार कोणतेही तपशिल, नोंदवहया त्याचे कडे सादर करेल.

111. वाळू / रेतीची वाहतूक करताना गावातील नागरीकांना त्याचा त्रास होणार नाही किंवा त्यांना जिवीत वा वित्तीय हानी पोहचणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी लिलावधारक यांची राहील. तसेच वापर करण्यात येत असलेले रस्ते खराब होणार नाही याची दक्षता घ्यावी अथवा वाळू / रेती वाहतुकीकरीता उपलब्ध झाल्यास गावाचे बाहेरील रस्त्याचा वापर करण्यात यावा तसेच शाळा सुरु होणे व सुटण्याचे वेळी वाहतूक करता येणार नाही.

112. वाळुचे अवैध उत्खनन / वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या वाहनांचा परवानाबरोबर वाहन चालकाच्या लायसन्सवर मोटार वाहन कायद्यानुसार परिवहन विभागास प्राप्त अधिकारात सदर चालकाचे लायसन्स पहिल्या गुन्हयाकरिता 6 महिन्याकरिता निलंबित केले जाईल अशाच प्रकारचा दुसरा गुन्हा करताना एखादा वाहन चालक आढळल्यास त्याचे ड्रायव्हिंग लायसन्स कायमस्वरुपी रद्य करण्यात येईल.

113. लिलावधारकाने लिलाव स्थळी काम करण्यासाठी संचलित केलेल्या मजूरांबाबत प्रचलित कामगार कायद्याप्रमाणे व अनुषंगीक नियमाप्रमाणे कामकाज करणे आवश्यक राहील.

114. लिलाव झालेल्या वाळू / रेती गटातून वाळू उत्खननासाठी लिलावधारकास येणाऱ्या मोठया अडचणी व विविध व्यक्ती व संस्थाकडून वाळू उत्खननाबात करण्यात येणाऱ्या गंभीर तक्रारी संदर्भात चौकशी करुन चौकशीच्या निष्कर्षानुसार कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली व तालुका पातळीवर उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुढील अधिकाऱ्यांचा समावेश असलेली समिती राहील.

115.

| | |
|---|---|
| 1 जिल्हाधिकारी - | - अध्यक्ष |
| 2 मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर | - सदस्य |
| 3 पोलीस अधिक्षक, सोलापूर | - सदस्य |
| 4 अपर जिल्हाधिकारी,सोलापूर | - सदस्य |
| 5 कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | - सदस्य |
| 6 कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग | - सदस्य |
| 7 उप वनसंरक्षक | - सदस्य |
| 8 प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर . | - सदस्य |

9 प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ - सदस्य

10 वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण यंत्रणा - सदस्य

10 जिल्हा खनिकर्म अधिकारी - सदस्य सचिव

**उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती**

1 उपविभागीय अधिकारी - अध्यक्ष

2 उपविभागीय पोलीस अधिकारी - सदस्य

3 कनिष्ठ भूवैज्ञानिक (भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयामार्फत नामनिर्देशित) - सदस्य

4 कनिष्ठ भूवैज्ञानिक (भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा संचालनालयामार्फत नामनिर्देशित) - सदस्य

5 गटविकास अधिकारी पंचायत समिती - सदस्य

6 उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग - सदस्य

7 उप अभियंता, जलसंपदा विभाग - सदस्य

8 महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे प्रतिनिधी - सदस्य

9 प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांचे प्रतिनिधी - सदस्य

10 तहसिलदार - सदस्य सचिव

116. एकदा अत्युच्च बोली स्वीकारुन अंतिम करण्यात आलेल्या लिलावात वाळू उत्खनन करण्यास लिलावधारकास काही अडचणी / अडथळे आल्यास, त्यांनी याबाबत संबंधित तहसीलदार यांचेकडे अर्ज सादर करावा. संबंधित तहसीलदार यांनी अर्ज प्राप्त झाल्यांनतर त्या वाळू गटातुन उत्खनन करण्यास येणाऱ्या अडचणींची चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हास्तरीय समितीसमोर सादर करावा. सदर अहवालावर जिल्हास्तरीय समितीने 15 दिवसांत निर्णय घेईल.

117. वाळू / रेती स्थळातून लिलावांच्या अटी / शर्तीचे उल्लंघन करुन वाळूचे उत्खनन होते, अवैध / नियमबाहय वाळू उत्खननामुळे नदी काठच्या गावातील पिण्याचा व शेतीच्या पाण्यावर विपरीत परिणाम होतो. वाळूच्या वाहतूकीमुळे नदी काठच्या शेतीची / रस्त्याची हानी होते. अशा व इतर स्वरुपाच्या तक्रारी विविध व्यक्ती व संस्थाकडून प्राप्त झाल्यास, अशा तक्रारीची तहसिलदार यांनी चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हास्तरीय समितीसमोर सादर करावा. सदर अहवालावर जिल्हास्तरीय समिती 15 दिवसात निर्णय घेईल.

118. लिलावधारकास वाळू उत्खनन करण्यास होणाऱ्या स्थानिक विरोधामुळे किंवा त्याच्या नियंत्रणाबाहेरील व नैसर्गिक सबळ कारणामुळे वाळूचे उत्खनन करता येत नसल्यास लिलावधारकाने वरील जिल्हास्तरीय समिती समोर अर्ज करावा. याप्रमाणे लेखी अर्ज प्राप्त झाल्यास सदर समिती अशा वाळू / रेती स्थळांना प्रत्यक्ष भेट देऊन त्या वाळू / रेती स्थळाचे पुनश्च सर्वेक्षण करणेत येईल. तसेच तक्रारीतील अन्य मुद्याबाबत स्थानिक चौकशी करावी व समितीच्या बैठकीत त्यावर विचार विनिमय करुन संबंधित वाळू / रेती गटातून वाळूचे उत्खनन चालू ठेवण्याविषयी किंवा ते बंद

करण्याबाबत 15 दिवसांत उचित निर्णय येईल व तो निर्णय संबंधीत लिलावधारक, तक्रारदार व क्षेत्रीय महसूल अधिकाऱ्यांना कळवील. याबाबत जिल्हास्तरीय समिती सर्वेक्षणाच्या वेळी व्हीडीओ चित्रीकरण सुध्दा करील.

119. ज्या तक्रारदारास समितीच्या अध्यक्षांचा निर्णय मान्य नसेल अशा तक्रारदाराला याबाबत विभागीय आयुक्त यांचेकडे अपील करता येईल.

120. वरीलप्रमाणे वाळू उत्खननासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर जिल्हास्तरीय समितीने चौकशी करुन ज्या वाळूगटातील वाळूचे उत्खनन बंद करण्याविषयी निर्णय घेतला असेल, अशावेळी लिलावधारकासोबत करण्यात आलेला करारनामा तात्काळ रद्द करण्यात येईल. तसेच संबंधित लिलावधारक यांना लिलावाची रक्कम अथवा यथास्थिती उत्खनन न करता आलेल्या वाळूची रक्कम परत करण्याबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

121. लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत ठेका रद्द केल्यास किंवा लिलावधारकास वाळू / रेती उत्खनन करण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर कोणत्याही प्रकारचा दावा /खटला भरता येणार नाही.

122. लिलावधारकाने मंजुर क्षेत्रामध्ये पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, खाणकाम आराखडा प्रमाणे वाळूगट परिसरामध्ये व गावातील वाहतूक रस्त्यावर CPCB Guideline नुसार स्थानिक वन अधिकारी व फलोत्पादन अधिकारी यांचे मदतीने झाडे लावून हरियाली (Greenbelt) करावी लागेल. तसे न केलेस अनामत रक्कम जप्त करणेत येईल.

123. लिलावधारकास त्याच्या स्वखर्चाने त्याला आदेश केलेल्या वाळूस्थळांचे निरीक्षण व इतर बाबींसाठी जिल्हास्तरीय पथकास लिलाव कालावधीमध्ये तपासणीकामी सदर पथकाने दिलेल्या निर्देशानुसार स्कॉर्पिओ व तत्सम वाहन उपलब्ध करुन द्यावयाचे आहे. तसेच उत्खननबाबत मोजणी करणेकामी प्रशासनाचे मागणीनुसार ड्रोन कॅमेरा उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. तसेच वाळूचे लिलावांसदर्भात संपुर्ण नियत्रंणकामी आधुनिक पध्दतीने सॉफटेवअर व हार्डवेअर व त्याचा खर्च लिलावधारकास करणे बंधनकारक राहील.

124. या अटी व शर्ती व्यतिरिक्त एखादी अट निविदेत नमुद करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडे राखुन ठेवला आहे.

125. वरीलपैकी कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास सर्व अनामत रक्कम जप्त करुन लिलाव रद्य करण्यात येईल आणि इतर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

126. सदर निविदेमध्ये बाबी, अटी व शर्ती मध्ये समाविष्ट बाबी यामध्ये फेर बदल करणे, चुक दुरुस्ती करणे किंवा शासनाच्या धोरणामध्ये बदल झाल्यास निविदेमध्ये बदल करणे व रद्य करणे यांचे सर्वस्वी अधिकारी अधिकार जिल्हाधिकारी, सोलापूर यांना राहतील.

127. (1) **लिलावाची रक्कम परत करण्यासंबंधीची कारणे व अधिकार** :-

(अ) वाळूगटाचा यशस्वीरित्या लिलाव झाल्यानंतर लिलावधारकाने लिलावाची रक्कम तसेच इतर संबंधित रकमा शासनजमा केल्यानंतर संबंधित लिलावधारक यांना काही अपरिहार्य कारणास्तव वाळूगटाचा ताबा देणे शक्य

झाला नसेल / होत नसेल अशा प्रकरणात जिल्हास्तरीय समितीने गरज असल्यास स्थळ पहाणी करुन, वाळूगटाचा ताबा देणे शक्य नाही, असा अहवाल शिफारशीसह सादर केल्यास लिलावाची रक्कम परत करण्याबाबत पुढील योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

(ब) लिलावधारक यांनी लिलावाची रक्कम तसेच इतर संबंधित रकमा शासनजमा केल्या असतील आणि कोणत्याही न्यायालयीन आदेशाने किंवा शासनाच्या तसेच वरिष्ठ प्राधिकरणाच्या आदेशाने वाळू उत्खननास स्थगिती देण्यात आली आहे, त्या कालावधीच्या प्रमाणात लिलावाची प्रमाणशीर रक्कम परत करण्याबाबत पुढील योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

(क) अन्य कोणत्याही कारणास्तव वाळू उत्खनन करणे शक्य झाले नसेल / होत नसेल (उदा. ग्रामस्थांचा विरोध, प्रशासकीय यंत्रणाचा विरोध) अशा प्रकरणात जिल्हास्तरीय समिती प्रत्यक्ष स्थळ पहाणी करुन, लिलावधारक तसेच ग्रामस्थांनी दिलेल्या कारणांची खातरजमा करुन, संबंधित वाळूगटातून वाळूचे उत्खनन करणे शक्य आहे किंवा कसे, याबाबत सुस्पष्ट अभिप्राय जिल्हाधिकारी यांना सादर करील. जिल्हाधिकारी यांनी जिल्हास्तरीय समितीने वाळू उत्खनन न करता येण्याबाबत दिलेल्या कारणांची तपासणी करुन, सदर कारणे समर्पक असल्यास लिलावस्थळाचा ताबा परत घेतील व संबंधित लिलावधारक यांना लिलावाची रक्कम / प्रमाणशीर रक्कम परत करण्यासंबंधीचा स्वयंस्पष्ट प्रस्ताव शिफारशीसह मा.विभागीय आयुक्त यांच्यामार्फत शासनास सादर करणेसंदर्भात कार्यवाही करतील.

(2) **लिलावाची प्रमाणशीर रक्कम परत करण्याकामी परिगणना** :-

(अ) लिलावाची देकाराची रक्कम व लिलावातील अंदाजीत वाळूसाठा यानुसार वाळूची प्रतिब्रास किंवा यथास्थिती प्रतिमेट्रीक टन किंमत परिगणीत करण्यात येईल.

(ब) लिलावातील अंदाजीत वाळूसाठा व वाळू उत्खननासाठी उपलब्ध कालावधी यानुसार दरदिवशी उत्खनन करावयाच्या वाळूचे सरासरी परिमाण निश्चित करण्यात येईल. लिलावधारकास ज्या कालावधीसाठी वाळू उत्खनन स्थगित / बंद ठेवावे लागले तो कालावधी व दरदिवशी उत्खनन करावयाच्या वाळूचे सरासरी परिमाण यानुसार स्थगित / बंद कालावधीमध्ये उत्खनन करता येऊ न शकलेला वाळूसाठा निश्चित करण्यात येईल.

(क) वरील क्रमांक (ब) नुसार निश्चित केलेला वाळूसाठा व प्रत्यक्षात उत्खनन न करता आलेला वाळूसाठा यापैकी जो कमी असेल, तेवढया वाळूसाठी वरील क्रमांक (अ) येथील प्रतिब्रास किंवा यथास्थिती प्रतिमेट्रीक टन दरानुसार लिलावधारकास देय रकमेची परिगणना करण्यात येईल.

**सही/*****
**(मिलिंद शंभरकर भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, सोलापूर**

------ xxxxx -------

**वाळू / रेतीघाट ई निविदा/ई ऑक्शन धारकाने स्वखर्चाने विकत घेतलेल्या रुपये 500/- चे मुद्रांकित स्टॅम पेपरवर दोन साक्षीदारांसह द्यावयाचे प्रतिज्ञापत्र**

**शपथपत्र**

मी. (पूर्ण नाव)--------------------------------------------------------------------------------------------------------
राहणार (पोस्टाचा पूर्ण पत्ता द्यावा)------------------------------------------------------------------------------------
ता. ---------------------------------- जिल्हा -----------------------------------------------------------------------------
माझे / माझ्या संस्थेचे पॅन क्रमांक -------------------------- GST नं.---------------------------------------------------

मी प्रतिज्ञापूर्वक घोषित करतो की, मी मौजे -------------------- ता -------------- येथील वर्ष 2021-22 साठीच्या रेती लिलावाच्या अनुषंगाने स्थानिक वर्तमानपत्रात -------------------------- वेबसाईटवर प्रसिध्द झालेल्या ई-निविदेतील सर्व अटी व शर्तीची माहिती करुन घेतली आहे व मी निविदेत प्रस्तावित केलेल्या किंमतीत उक्त रेती घाट घेण्यास इच्छूक असून त्याची 25% रक्कम रु ------------- शासन जमा करीत आहे.

मला सदर रेती घाट मंजूर झाल्यास, लगेच भरणे आवश्यक असलेल्या लिलावातील सर्वोच्च बोलीच्या 25% रक्कमेपैकी वर नमुद EMD वजा जाता शिल्लक राहणारी रक्कम लिलाव मिळताच 48 तासात मी भरेल. लिलावात मंजूर करण्यात आलेल्या रु ------------- किमतीच्या उर्वरित 75% रक्कम मी एक महिन्याच्या आत चलनाद्वारे शासन जमा करुन मंजूर वाळू / रेती घाटाचे निष्पादन करुन घेण्याची हमी देत आहे. सदरची रक्कम मुदतीत भरण्यास मी कसूरदार ठरल्यास मी जमा केलेली 25% रक्कम रु -------- शासन जमा करण्यास माझी हरकत नाही.

तसेच नियमानुसार फेर निविदेद्वारे दुसऱ्या निविदा धारकास सदरचा रेती घाट मंजूर केल्यास माझी काही हरकत राहणार नाही. फेर निविदेद्वारे शासनाच्या महसूलाचे काही नुकसान झाल्यास, सदर नुकसानीची भरपाई जमीन महसुलाची थकबाकी म्हणून माझ्याकडून वसूल करण्यास मी संमती देत आहे.

प्रत्यक्ष उत्खननासाठी त्या-त्या वर्षात साधारणत जानेवारी ते 09 जुन हा कालावधी उपलब्ध राहील. परंतु हया कालावधीत नैसर्गिक परिस्थिती / हवामान व पर्यावरण अनुमती (EC) साठी लागणारा वेळ यामुळे घट सुध्दा येऊ शकते याची मला जाणीव आहे. कोणत्याही परिस्थितीत उत्खनन कालावधी हा संपुर्ण 1 वर्षाचा राहणार नाही याची मला स्पष्ट जाणीव आहे. त्यासोबतच्या त्या-त्या लिलाव वर्षात 10 जुन ते 30 सप्टेंबर मध्ये कुठल्याही परिस्थितीत उत्खनन व वाहतूक करता येणार नाही याची मला जाणीव आहे.

मी उपरोक्त उत्खनन कालावधी बाबतच्या तरतुदी समजुन घेऊन निविदा भरणेबाबत व उत्खनन कालावधीबाबत नोंद घेतली असुन सदर बाब समजली असल्याने तसेच कुठल्याही परिस्थितीत उत्खनन कालावधी वाढवून देण्याचा विनंतीबाबत तक्रार करणार नाही.

फेर निविदेत पूर्वी मंजूर करण्यात आलेल्या लिलावाच्या रक्कमेपेक्षा अधिकची रक्कम आल्यास आधीकच्या रक्कमेवर माझा काहीही अधिकार राहणार नाही.

मी असेही घोषित करतो की, सदरहू रेती घाट आणि रेती घाटास जाणार पोच / गाव रस्ते इत्यादीची मी पाहणी केली आहे. तसेच सदर रेतीघाट पाण्याखाली नाही व त्याच्या परिस्थितीबाबत अथवा रेती वाहतुकीच्या योग्यतेबाबत मी भविष्यात कोणताही आक्षेप / वाद उपस्थित करणार नाही.

ठिकाण -----------------
दिनांक -----------------

साक्षीदार / हमीदार                                                            अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

1. पूर्ण नाव ------------------------------- स्वाक्षरी ----------------
   पत्ता-------------------------------------------------------------

2. पूर्ण नाव------------------------------- स्वाक्षरी----------------
   पत्ता -------------------------------------------------------------

**वाळूघाट ई-निविदा/ई-ऑक्शन धारकाने स्वखर्चाने रु.500/- च्या प्रतिज्ञापत्रावर द्यावयाचे प्रतिज्ञापत्र.**

**हमीपत्र**

मी/आम्ही ------------------------------------------------------------- रा.------------------------------------ ता-------------------- जि.----------------------- माझे/आमच्या संस्थेचे पॅन क्रमांक------------------GST क्रमांक ------------------------- आधार क्रमांक

1) मला सदर वाळूस्थळ मंजूर झाल्यास मी भरणा केलेली 25% इसारा रक्कम वजा जाता सर्वोच्च बोलीच्या 1/4 रक्कम लिलावाच्याच दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयात ऑनलाईनद्वारे भरणा करेन. तसेच उर्वरित 3/4 रक्कम लिलावाच्या दिनांकापासुन एक महिन्याच्या आत ग्रासप्रणालीद्वारे शासकीय खजिन्यात भरणा करणेची हमी देत आहे. तसेच अधिसुचनेत नमुद केलेनुसार मी निवडलेल्या वाळूस्थळाच्या सर्वोच्च बोलीव्यतिरिक्त इतर सर्व शासन देय रक्कम 15 दिवसाच्या आत शासनजमा करेन. सदरची रक्कम विहित मुदतीत ग्रासप्रणालीद्वारे शासकीय खजिन्यात भरणेस मी कसुरदार ठरल्यास मी जमा केलेली 25% इसारा रक्कम जप्त करणेस माझी हरकत नाही.

2) मी/आम्ही प्रतिज्ञापूर्वक घोषित करतो की, मी/आम्ही सोलापूर जिल्हयात सन 2021-22 करिता होणाऱ्या वाळुस्थळ लिलावामधील निवडलेल्या (ई-निविदा-ई-ऑक्शनद्वारे) वाळूस्थळांच्या अनुंषगाने उक्त अधिसुचनेतील ई-निविदा, ई-लिलावातील सर्व अटी व शर्ती तसेच सोलापूर जिल्हयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध **वाळू लिलावाच्या अटी व शर्ती, परिशिष्ट-1 तसेच जाहिरामधील अटी व शर्ती बाबत** माहिती करुन घेतली आहे. या सर्व अटी व शर्ती मान्य असुन त्याचे पालन करणे मला बंधनकारक आहे. मी/आम्ही निवडलेल्या वाळूस्थळाबाबत निविदेत प्रस्तावित केलेनुसार 25% इसारा रक्कम RTGS द्वारे भरुन सदर लिलाव प्रक्रियेत सहभागी होत आहे.

3) प्रत्यक्ष उत्खननासाठी त्या-त्या वर्षात साधारणत जानेवारी ते 09 जुन हा कालावधी उपलब्ध राहील. परंतु हया कालावधीत नैर्सगिक परिस्थिती / हवामान व पर्यावरण अनुमती (EC) साठी लागणारा वेळ यामुळे घट सुध्दा येऊ शकते याची मला जाणीव आहे. कोणत्याही परिस्थितीत उत्खनन कालावधी हा संपुर्ण 1 वर्षाचा राहणार नाही याची मला स्पष्ट जाणीव आहे. त्यासोबतच्या त्या-त्या लिलाव वर्षात 10 जुन ते 30 सप्टेंबर मध्ये कुठल्याही परिस्थितीत उत्खनन व वाहतूक करता येणार नाही याची मला जाणीव आहे.

मी उपरोक्त उत्खनन कालावधी बाबतच्या तरतुदी समजुन घेऊन निविदा भरणेबाबत व उत्खनन कालावधीबाबत नोंद घेतली असुन सदर बाब समजली असल्याने तसेच कुठल्याही परिस्थितीत उत्खनन कालावधी वाढवून देण्याचा विनंतीबाबत तक्रार करणार नाही.

3) नियमानुसार फेरनिविदा/फेरलिलावद्वारे दुसऱ्या निविदाधारकास सदरची वाळूस्थळ मंजूर केलेस माझी / आम्ही काही हरकत नाही. सदरचा फेरनिविदा/फेरलिलावाद्वारे शासनाच्या महसूलाचे जे नुकसान होईल त्या नुकसानाची भरपाई जमीन महसूलाची थकबाकी म्हणून माझेकडुन / आमचेकडुन वसूल करणेस मी संमती देत आहे.

4) फेरनिविदा/फेरलिलावाद्वारे पूर्वी मंजुर करणेत आलेल्या लिलावाच्या रक्कमेपक्षा अधिकची रक्कम आल्यास अधिकच्या रक्कमेवर माझा काहीही अधिकार राहणार नाही.

5) मी/आम्ही असेही घोषित करतो की, मला यापुर्वी महाराष्ट्र राज्याच्या कुठल्याही जिल्हयात कोणत्याही कारणास्तव राहील. लिलावप्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रतिबंध (काळया यादीत) केलेले नाही.

6) मी/आम्ही लिलावाच्या जाहिरातीमध्ये नमूद वाळू स्थळात अपेक्षित वाळूसाठा असल्याची वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध असल्याचे, तसेच वाळूस्थळात वाळू ही मातीमिश्रीत नसल्याचे खात्री केली आहे. त्यामुळे सदर परिस्थितीबाबत मी भविष्यात अथवा वाळूगट बदलून देण्याची किंवा वाळूलिलावापोटी शासन जमा केलेल्या रक्कमेपैकी प्रमाणशीर रक्कम परत करणेबाबत कोणतेही तोंडी/लेखी शासनास/जिल्हाधिकारी कार्यालयास तक्रार करणार नाही.

www.solapur.gov.in व https://solapurco.abcprocure.com **या संकेतस्थळावर अटी व शर्ती तसेच नमुद केलेल्या लिलावाबाबतचे सुचनापत्रातील सर्व अटी शर्ती मान्य आहे**.

वरीलप्रमाणे सर्व माहिती खरी असून यामध्ये काही चुकीची अथवा दिशाभुल करणारी तसेच खोटी माहिती आढळल्यास मी भारतीय दंड विधान संहिता 1861 कलम 199 व 200 नुसार शिक्षेस पात्र राहील.

साक्षीदार / हमीदार

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

1. पूर्ण नाव ------------------------------- स्वाक्षरी ----------------
   पत्ता----------------------------------------------------------

2. पूर्ण नाव-------------------------------- स्वाक्षरी---------------
   पत्ता ----------------------------------------------------------

| परिशिष्ट-अ | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | तालुका | वाळूस्थळाचे नाव | नदीपात्रा लगतचे गट नंबर/ सर्व्हे नंबर | भुखंडातील उपलब्ध वाळूसाठा ब्रासमध्ये | हातची किंमत (आकडे रुपयात) | ई-निविदा, ई-लिलावाकरिता भाग घेण्यासाठी भरावयाची 25% इसारा रक्कम (EMD) (आकडे रुपयात) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | मोहोळ | अर्धनारी साठा-1 | **अर्धनारी** - गट नं. 7 पै, 9पै. | 15780 | 69000000 | 17250000 |
| 2 | मोहोळ-मंगळवेढा | मिरी-तांडोर साठा-1 | **मिरी** - गट नं.55, 56, 57, 68.<br>**तांडोर** - गट नं.203पै, 205, 207, 208, 209, 213, 214. | 15710 | 68700000 | 17175000 |
| 3 | मोहोळ-मंगळवेढा | मिरी-सिध्दापूर साठा-1 | **मिरी** - गट नं.49, 48, 45, 44, 41, 40, 33.<br>**सिध्दापूर** - गट नं. 485, 486, 1पै. | 15335 | 67100000 | 16775000 |
| 4 | मोहोळ-मंगळवेढा | अर्धनारी-बठाण साठा-1 | **अर्धनारी** - गट नं.38 पैकी<br>**बठाण** - गट नं.102, 103, 104, 105, 106. | 15848 | 69300000 | 17325000 |
| 5 | मोहोळ-मंगळवेढा | अर्धनारी-बठाण साठा-2 | **अर्धनारी** - गट नं.38 पै,<br>**बठाण** - गट नं.124, 125, 129 ते 132, 135 136, 138, 139, 141, 142, 143, 145. | 15768 | 69000000 | 17250000 |
| 6 | मोहोळ-मंगळवेढा | अर्धनारी-बठाण साठा-3 | **अर्धनारी** - गट नं.28, 26, 25 पै,<br>**बठाण** - गट नं.164, 167 ते 174. | 15526 | 68000000 | 17000000 |
| 7 | मोहोळ-मंगळवेढा | घोडेश्वर-तामदर्डी साठा-1 | **घोडेश्वर** - गट नं.115 पै, 112 पै.<br>**तामदर्डी** - गट नं.344 ते 348. | 15554 | 68000000 | 17000000 |
| 8 | मोहोळ-मंगळवेढा | घोडेश्वर-तामदर्डी साठा-2 | **घोडेश्वर** - गट नं.108 पै, 107, 105, 104.<br>**तामदर्डी** - गट नं.1, 6, 7, 16, 17, 15. | 15319 | 67000000 | 16750000 |
| 9 | मोहोळ-मंगळवेढा | घोडेश्वर-तामदर्डी साठा-3 | **घोडेश्वर** - गट नं.98, 97, 96, 94 पै.<br>**तामदर्डी** - गट नं.49, 50, 51 पै. | 15691 | 68600000 | 17150000 |

**सही/*****
**(मिलींद शंभरकर भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, सोलापूर.**